The only thing that the Evil needs to survive, thrive and prosper is good people doing nothing -- *Edmund Berke*

**जगातील वाईटपणा टिकून राहण्यासाठी, तो यशस्वी होण्यासाठी आणि वाढीला लागण्यासाठी एकाच गोष्टीची गरज आहे; ती म्हणजे चांगल्या माणसांनी काहीच करावयाचे नसते.**

***- एडमंड बर्क (1730-97)***

# Unit 1: Introduction to Philosophy

## प्रकरण 1. तत्त्वज्ञानाचा परिचय

प्रस्तावना -

### तत्त्वज्ञानाचा उदय

**मा**नवाचे पृथ्वीवरील अस्तित्व नक्की कोणत्या काळापासून आहे,मानव प्राणी 'माणूस' म्हणून कधी विकसित झाला,त्याने 'समाज' कधी निर्माण केला,जनावरापासून तो 'माणसात' कधी आला, या आणि अशा प्रश्नांची उत्तरे देणे कठीण आहे. मानवाचा हा सगळा अज्ञात इतिहास आहे. चार्ल्स डार्विन या शास्त्रज्ञाच्या मते अतिसूक्ष्म किटकापासून ते डोंगराएवढ्या डायनासोरसारख्या सर्वच पशु पक्षांचा जन्म या अमीबा नामक एका पेशीय जीवापासून झाला.पृथ्वीवरील सजीवांच्या अस्तित्वाची निर्मिती हे एक गूढ आहे,तो एक प्रचंड गोंधळ आहे. या गोंधळातच माणसाची उत्क्रांती होत गेली; पण ती कोणत्या टप्प्यांवर झाली हे निश्चितपणे सांगता येत नाही. थोडक्यात मानवी अस्तित्वाचा उगम अज्ञात आहे.

शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार पहिला जीव पृथ्वीवर साधारणत: 385 कोटी वर्षापूर्वी निर्माण झाला.पृथ्वीवर जीवन कसं, केंव्हा, कुठे सुरु झालं या विषयी आजही तर्क चालू आहेत.पहिल्या जीवापासून कोट्यावधी जीवप्रकार कसे सुरु झाले, याचे शास्त्रीय चार्ल्स डार्विन या शास्त्रज्ञाने (1809 - 1882) उत्तर दिले. पोलंडच्या ' इन्स्टिट्युट ऑफ फिलॉसॉफी ॲण्ड सोशॉलॉजी 'मधल्या ल्युगोव्हस्की या संशोधकाने 1995 साली जीवनाच्या उगमाचे 150 सिध्दान्त मांडले .[1] डाविर्ननच्या मते माणूस हा हळूहळू उत्क्रांत होत गेलेला जीव आहे.तो पृथ्वीवरील सर्वात जुना रहिवासी आहे. *आदिमानव* व *आजचा माणूस* यातील *फरक* हाच तर माणसाचा इतिहास आहे.

माणसाला 'माणूस' म्हणून जी प्रतिष्ठा प्राप्त झाली,सर्व सजीवात **'सर्व शक्तिमान सर्वश्रेष्ठ'** अशी पदवी प्राप्त झाली ती त्याने स्वत:च प्राप्त करुन घेतलेली आहे. अत्यंत अवघड, भरड,अत्यंत अक्राळ विक्राळ भीतीदायक निसर्गाशी झगडून आपले अस्तित्व माणसाने पृथ्वीवर टिकविले आहे. कधी निसर्गाशी झगडा करुन,कधी त्याच्यावर विजय प्राप्त करुन,तर कधी त्याला सपशेल शरण जाऊन तर कधी त्याच्याशी मैत्री करुन माणसाने आपले अद्वितीय,स्थान निर्माण केले आहे. इतर प्राणी हे काही करु शकले नाहीत.

या विकासक्रमाविषयी दोन प्रश्न उपस्थित करता येतील:

1) *मानवाने पृथ्वीवर जन्म घेतला तेव्हा त्याला ही पृथ्वी कशी वाटली ?*
2) *आदिमानवाचा संचार पृथ्वीवर सुरु झाला तेव्हा ही पृथ्वी कशी होती ?*

मानवाने जन्म घेतला तेंव्हा हे अगणित अनंत तारकांनी भरलेले आकाश त्याला कसे वाटले ? सतत कोसळणारा पाऊस , उंचच्या उंच पर्वत,भयानक वादळ आणि अचानक उगवणारे चंद्र, सूर्य,तारे, रात्र ,दिवस, रोज दिसणारा चंद्र एके रात्री गायबच होतो म्हणजे काय ? हे सारे विचित्र पाहून त्याला काय वाटले ? तो आनंदाने रोमांचित झाला की घाबरुन गेला ? त्याच्या मनात भीती ,कुतुहल , संताप, चिंता ,करुणा ,प्रेम अशा कोणत्या भावना निर्माण झाल्या ? तो संभ्रमित झाला की चिंतातूर झाला ? कोणती वैचारिक आणि मानसिक आंदोलने त्यांच्या मनात निर्माण झाली ? मुळात आदिमानवाला मन होते

[1] अच्युत गोडबोले , ''जीवनाचा उगम'', पान 437 *किमयागार* जुलै 2007 राजहंस प्रकाशन, पुणे.

काय ? आत्मा होता काय ? मन, आत्मा असल्यास त्यांची जाणीव त्यास होती का ? की ती विकसित करण्यातच त्याचे अस्तित्व सिध्द झाले ? हे ''आपणास काहीही माहित नाही'' एवढेच नव्हे तर ''मी कोण आहे ? इतर प्राण्यांमध्ये आणि माझ्यात कोणता फरक आहे ? आणि कोणते साम्य आहे ? माझे वेगळे असे काही वैशिष्टय आहे काय ? '' असे विचार त्याला सुचले असतील काय ? यापैकी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देणे अशक्य आहे.

आदिमानवाचा संचार पृथ्वीवर सुरु झाला तेव्हा ही पृथ्वी कशी होती ? तत्कालीन निसर्गाचे स्वरुप कसे होते ? आपले अस्तित्व टिकविण्यासाठी आदिमानवाला कसा कोणता कुणाशी किती काळ संघर्ष करावा लागला ? यात खुद्द निसर्ग,प्राणी आणि स्वजन यांच्याशी कसे संघर्ष झाले ? इतिहास केवळ माणसांमधील संघर्षाचाच का आहे ? हे सगळेच आपणास अज्ञात आहे. हा सगळा भूतकाळ अत्यंत धूसर अत्यंत अस्पष्ट व अनिश्चित आहे पण हे निश्चित आहे की माणसाने या धडपडीतूनच आपली स्वत:ची स्वतंत्र संस्कृतीची निर्मिती केली.

माणसाची धडपड माणसात आत्मविकासाची प्रेरणा निर्माण करते.ही प्रेरणाच त्याला सृजनशील बनविते आणि त्याची विवेकशीलता विकसित करते.या आत्मविकासाचा प्रवास संथ गतीने पण जाणीवपूर्वक होत गेला. आजही तो प्रवास गतिमान आहे.हा प्रवास मानसिक व वैचारिक स्वरूपाचा असून या प्रवासाचे मुख्य तीन घटक सांगता येतील.

## वैचारिक प्रवासाचे तीन घटक

### *(1) विवेकशक्ति : एक महाशक्ती (Reason)*

सर्व सजीव प्राण्यामध्ये माणूस जन्माने श्रेष्ठ आणि टिकून राहिलेला एकमेव प्राणी आहे,याचे रहस्य काय ? तर सर्व सजीवात जी शक्ती मानवेतर प्राण्यांमध्ये एकतर मुळात नाही किंवा अत्यल्प असते,अशी शक्ती म्हणजे विवेकशक्ति [2] होय.ती फक्त माणसाकडे आहे. विवेकशक्तिच्या साह्यानेच सर्व संकटावर मात करुन माणसाने आपले अस्तित्व टिकविले. जिवंत राहण्यासाठी नेमके काय करावे, याचा विवेक माणसानेच केला. विवेकशक्ति ही मानवी मेंदूने म्हणजेच माणसाने विकसित केलेली महत्वाची बाब आहे.खरे पाहता मानवी मेंदू हे जगातील सर्वात मोठे आश्चर्यच आहे. सर्व सजीवांमध्ये सर्वात असहाय,परावलंबी आणि अत्यंत असुरक्षित जीव असूनही माणूसच या संघर्षात टिकला त्याचे कारण "आपण टिकून रहावे'' हा विचार केवळ माणसालाच सुचला. यातून येणारे दुसरे वैशिष्टय म्हणजे आत्मभान.

### *(2) आत्मभान :*

बौध्दिक क्षमता वापरून माणसाने एक महत्वाची गोष्ट विकसित केली. ती म्हणजे आत्मभान. स्वत: विषयीची जाणीव. "मी आहे" ही जाणीव केवळ माणसालाच असते.प्राण्यांना जाणीव नसते. प्राण्यांना जिवंतपणा असतो.ते स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव इतरांना करूनही देवू शकतात,तथापि त्यांना स्वत:ला स्वत:ची जाणीव असेलच असे म्हणता येत नाही.आणि समजा असली तरी त्या जाणीवेतून ते आत्मभान व त्यातून माणसाने जशी संस्कृती निर्माण केली तशी,संस्कृती निर्माण करू शकत नाहीत.माणूस मात्र ती निर्माण करतो. आत्मभानातूनच "मी कसा टिकून राहीन" अशी नवी जाणीव माणूस विकसीत करतो.आपल्या मुलाबाळांमध्ये आपले स्वत:चे रुप पाहतो . त्यांचे संगोपन करतो . "मी मरणारा आहे. मृत्यूने सारे काही संपते.पण मला ते संपवायचे नाही. मला माझे अस्तित्व टिकविले पाहिजे.माझे अस्तित्व म्हणजे माझी संतती. ती टिकली तर मी टिकेन.अस्तित्वात राहीन." असे स्वरूप या आत्मभानाचे तत्त्वज्ञानात्मक स्वरुप आहे.या आत्मभानाचीच परंपरा बनते. तेच त्याचे जगणे बनते .तिच्यामुळे माणूस टिकला.

थोडक्यात बुध्दी आणि आत्मभान या दोन शक्तींच्या आधारे जीवन संघर्ष करुन माणसाने आपले अस्तित्व टिकवले, हे निश्चित करुन चार्ल्स डार्विनने उत्क्रांतीवादाची दोन तत्त्वे सांगितली.ती अशी:

*अ) जगण्यासाठी संघर्ष (Struggle for Existence)*

*ब) जो श्रेष्ठ तोच टिकतो (Survival of the Fittest)*

डार्विनच्या मते कोणता प्राणी शारिरीकदृष्टया किती ताकदवान,अवाढव्य आहे यापेक्षा त्याच्याकडे टिकून राहण्याची क्षमता किती आहे यावर त्याचे अस्तित्वात राहाणे अवलंबून आहे.ज्याच्याकडे टिकून राहाण्याचा चिवटपणा आहे तोच

---

[2]'विच् ' (म्हणजे वेचणे) या धातूपासून विवेक हा शब्द बनतो.कृती करण्यासाठी उपलब्ध असलेल्या अनेक पर्यायांमधील योग्य पर्याय निवडणे याचा अर्थ विवेक करणे.

टिकतो.ही टिकण्याची क्षमता म्हणजे नैसर्गिक बदलांनुसार स्वत: बदलत जाणे.असा बदलणारा जीवच टिकतो.डोळ्यांना न दिसणाऱ्या अतिसूक्ष्म जीवांणूपासून ते डायनासोरसारख्या अवाढव्य प्राण्यांपर्यंत सर्वचजण जगण्याची धडपड करतात.पृथ्वीवरचा टिकून राहिलेला सर्वात जुना रहिवासी म्हणजे केवळ माणूसच !

*(3) करूणा*

विवेकशक्ति व आत्मजाणीवेतून केवळ माणसातच विकसित झालेली तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे करूणाभावाचा आविष्कार होय.मानवजात टिकून राहण्यात हा करूणाभाव वरील दोनापेक्षा अतिशय महत्वाची व कळीची भूमिका बजावतो.माणसाने ईश्वराची संकल्पना निर्माण केली.ईश्वर स्वीकारतात ते ईश्वरवादी होत.जे स्वीकारीत नाहीत ते निरीश्वरवादी आणि जे याबद्दल काहीही सांगत नाहीत ते अज्ञेयवादी तत्त्वज्ञ होत.

अशा सर्वांना कवेत घेणारी व्यापक भावना म्हणजे करूणा आहे.त्यामुळेच तर मानवतावादी ख्रिश्चन, बौध्द, जैन धर्माची निर्मिती होवू शकली.एवढेच नव्हे तर विसाव्या शतकाच्या मध्यात आणि या शतकाच्या चालू दशकात ज्या शाकाहारवाद, हरित चळवळ, पर्यावरणवाद,स्त्रीवाद इत्यादीची तात्त्विक मांडणी करण्यात येत आहे,त्यामागे ईश्वर,धर्म इत्यादीपेक्षा करूणा हाच उचित स्वरुपाचा निकष महत्वाचा मानला जातो.मानवजात टिकण्यामागे हा मूलभूत घटक आहेच.

या धडपडीतूनच आपली स्वत:ची स्वतंत्र संस्कृतीची निर्मिती केली.ही त्याची महान जीवनयात्रा कधी सुरु झाली व कधी संपणार हे सांगणे कठीण आहे,या यात्रेत किती स्त्रीपुरुष जन्माला आले,झगडले आणि विलीन झाले हे सांगता येत नाही पण ही संघर्ष यात्रा अजूनही चालू आहे.ती अनिश्चित भविष्याकडे जाते.ही यात्रा करीत असतानांच माणसाने जगण्याची पध्दती,एकमेकांशी वागण्याचे नियम तयार केले.पाककला,वस्त्रकला,संगीत, नाट्य,साहित्य,तंत्रज्ञान,विज्ञान,धर्म आणि परमोच्च बिंदू समजल्या जाणाऱ्या तत्त्वज्ञानाची निर्मिती केली. या साऱ्या घटकांनी संस्कृतीची उभारणी होते.

# Unit 1: Introduction to Philosophy

## घटक एक: ‘तत्त्वज्ञान’ या विषयाचा परिचय

(अ) तत्त्वज्ञानाच्या व्याख्या, स्वरूप आणि मर्यादा

(ब) तत्त्वज्ञानाच्या शाखांचा परिचय.

(क) तत्त्वज्ञानाचे मूल्य.

*(अ) तत्त्वज्ञानाच्या व्याख्या, स्वरूप आणि मर्यादा :*

तत्त्वज्ञानाचे स्वरूप समजावून घेण्यासाठी आपण ‘ तत्त्वज्ञान ’ किंवा Philosophy हा शब्द कसा तयार होतो, ते पाहू.त्यानंतर त्यांच्या व्याख्या आणि त्यांचे कार्य पाहू.एखादा शब्द तयार कसा होतो, ते स्पष्ट करणे म्हणजे त्या शब्दाचा उगम,इतिहास आणि अर्थ तपासणे होय.या अभ्यासाला ***व्युत्पत्तीशास्त्र (etymology)*** असे म्हणतात. अर्थात एखाद्या शब्दाचा जन्म ज्या कालात व संस्कृतीत होतो, तोच अर्थ पुढे चालू राहातो, असे नाही. तो अर्थ नंतर स्थलकालानुसार बदलत जावू शकतो.जसा स्थलकाल असेल तसा अर्थ अधिक योग्य व व्यापक आशयाचा होवू शकतो.तोच प्रकार ‘तत्त्वज्ञान’ (Philosophy) या संज्ञेबाबतही झाला आहे.

**‘तत्त्वज्ञान’ (Philosophy)** शब्दाची व्युत्पत्ती :

‘तत्त्वज्ञान’ या संज्ञेला इंग्लिशमध्ये Philosophy असा शब्द आहे. तत्वज्ञान आणि Philosophy हे शब्द परस्परांची भाषांतरे म्हणून वापरली जातात. तथापि या दोघांच्या अर्थांमध्ये मूलभूतच खूप फरक आहे.

पहिला उघड फरक असा की तत्त्वज्ञान हा प्राचीन संस्कृत शब्द आहे ; तर दुसरा Philosophy इंग्लिश शब्द आहे.संस्कृत ही प्राचीन वैदिक हिंदूंची भाषा आहे. तर इंग्लिश ही युरोपियन भाषा आहे याचाच अर्थ असा की या दोन्ही भाषा दोन भिन्न संस्कृती सुचवितात. साहजिकच त्याच्या अर्थातही बदल आहे पण हे अर्थ परस्परपूरक आहेत.ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील :

(A)Philosophy Íã°ªãÞããè Ì¾ãì¦¹ã§ããè :

Philosophy = Philos + Sophia
= Philein + Sophia
Philein = Love = प्रेम
Sophia = Wisdom = प्रज्ञान / सुज्ञान
Philosophy = Love of Wisdom = प्रज्ञानाविषयी प्रेम.

Philosophy हा शब्द Philos आणि Sophia[3] यांच्या समासातून बनतो. *Philo* किंवा Philos[4] या शब्दाचा मूळ ग्रीक धातू Philein असून त्याचा अर्थ Love आणि Sophia म्हणजे Wisdom. त्यामुळे Love of Wisdom = Philosophy.[5] म्हणून Philosophy = प्रज्ञानाविषयीचे प्रेम.

---

[3]*sophos* = wisdom या शब्दापासून इंग्लीशमध्ये काही शब्द बनतात.ते पुढीलप्रमाणे :

- *sophist* = one who loves knowledge ज्ञानावर प्रेम करणारा.
- *sophomore* = wise = ज्ञान and *moros* = foolish मुर्ख; *i.e.* one who thinks he knows many things. म्हणून *sophomore* = ज्ञानमुर्ख माणूस. याचा अर्थ “ मला खूप ज्ञान आहे” असे समजणारा माणूस.
- *sophisticated* = one who is knowledgeable ज्याच्याकडे खूप ज्ञान आहे, पण तो ते विकत देतो, भाडोत्री विद्वान, असा विद्वान. अधिक माहितीसाठी क्रमांक 7 ही टीप पाहा.

[4]*Philo*=love of, affinity for, liking of.Philos या शब्दापासून इंग्लीशमध्ये काही शब्द बनतात.ते पुढीलप्रमाणे :

- *Philander* = to engage in love affairs frivolously आनंदाने कशाच्या तरी प्रेमात पडणे. पण प्रेम करणे, याचा अर्थ मालकी दाखविणारे, हिंसात्मक विकृत प्रेम न करणे.
- *Philanthropy* = love of mankind in general मानवजातीविषयी प्रेम.

## प्रज्ञानाचे स्वरूप (The Nature of Wisdom)

ग्रीकांना या व्याख्येतून नेमके काय म्हणावयाचे आहे, हे थोडे पाहू :

साधारणत: आपण प्रेम करतो ते एक तर आपल्या प्रिय वस्तूवर अथवा व्यक्तीवर. व्यक्तिंना अथवा वस्तूंना लांबी,रुंदी,रंगरुप इत्यादी स्वरुपाचे भौतिक गुणधर्म असतात.त्यांच्यावर प्रेम करणे हे नेहमीचेच झाले. समजा भौतिक वस्तूंप्रमाणे अभौतिक पदार्थावर प्रेम करता येईल काय, असा प्रश्न उपस्थित केला तर ? उदाहरणार्थ मन,आत्मा,ईश्वर, ज्ञान, किंवा खुद्द प्रेम याच संकल्पना घेतल्या तर त्यांच्यावर प्रेम करणे कसे शक्य आहे ? या *अमूर्त संकल्पना* आहेत म्हणजे त्यांना केवळ मानसिक,ज्ञानात्मकच अस्तित्व आहे.

ग्रीक विचारवंतांच्या मते प्रज्ञान (Wisdom) हा सुध्दा असाच एक मानसिक पदार्थ आहे.ती संकल्पना आहे.ती भौतिक वस्तू नाही. या प्रज्ञानावरील प्रेम म्हणजे Philosophy. आता प्रश्न असा उपस्थित करता येईल की, जी वस्तू भौतिक नाही,जी कोणत्याही ज्ञानेंद्रियाद्वारे अनुभवास येत नाही,अभौतिक, अमूर्त शहाणपणावर प्रेम करायचं म्हणजे नेमकं काय करायचं ? या प्रज्ञानाचे स्वरुप काय ?

**शहाणपण आणि बुध्दिमत्ता** (Wisdom & Intelligence) यात ग्रीक विचारवंत फरक करतात. बुध्दिमान माणूस कदाचित 'चालता बोलता विश्वकोशही असेल' पण म्हणून तो शहाणा असेल असे नाही.म्हणजेच तो नीतीमान असेलच असे नाही.बुध्दिमान असून ही तो दुष्ट असू शकतो. प्रज्ञानी माणूस मात्र एक नैतिक माणूस असतो.किंबहुना नीतीमान असणे, हीच शहाणपणाची, प्रज्ञानी असण्याची पूर्वअट असते,असा ग्रीकांचा दृष्टिकोन होता.त्यांच्या मते माणसाची बुध्दिमत्ता नैतिकतेला पूरक ठरु शकते.मात्र ती आवश्यक अट नसते. एखादा निरक्षर माणूसही शहाणा असू शकतो.

## Wisdom प्रज्ञानाचा अर्थ

आता येथे 'प्रज्ञान' (Wisdom) या शब्दाचा अर्थ तपासला पाहिजे. ग्रीकांच्या मते Wisdom चे काटेकोर अर्थ अपेक्षित आहेत.ते दोन प्रकारचे आहेत : पहिला दैवी प्रज्ञान आणि दुसरा मानवी प्रज्ञान. Wisdom च्या अर्थाची ही दुहेरी संकल्पना सर्वप्रथम ग्रीक तत्त्वज्ञ पायथागोरसने मांडली.ती नंतरच्या ग्रीक विचारवंतांनी उचलून धरली. त्यामुळे आपण आता पायथागोरसची माहिती घेवू. पाथागोरस स्वत:ला जगातील पहिला तत्त्ववेत्ता समजतो. त्याचे गणिती प्रमेय आपणास शाळेत माहित झालेले असतेच, पण तो मुळात तत्त्ववेत्ता आणि प्रगल्भ, उच्च दर्जाचा गणिती होता. तो अतिशय पवित्र आणि साधू जीवन जगला.

## Philosophy चा शोध : पायथागोरस

Philosopher आणि Philosophy हे शब्द पायथागोरसनेच शोधले, असे म्हणतात.[6] पायथागोरसच्या काळी ग्रीसमध्ये गुरुने ज्ञानदान केवळ ज्ञानाच्या प्रसारासाठीच करावे,पैशासाठी करु नये, असा समज होता.कारण Wisdom म्हणजे ईश्वराचे ज्ञान, ही पवित्र गोष्ट असून ईश्वर ज्यांच्यावर कृपा करतो त्यांनाच तो 'प्रसाद' म्हणून ज्ञान देतो.

त्याकाळात सोफिस्ट Sophist[7] या नावाचे तत्त्वज्ञ स्वत:ला wise men समजत आणि त्यांचा तत्कालिन ग्रीक लोकशाहीवर मोठा प्रभाव होता.ते रोख पैसे घेवून शिकवित असत.त्यामुळे पायथागोरस त्यांना भाडोत्री विद्वान मानत असे.

---

- *Philately* = postage stamps hobby पोष्टाची तिकिटे जमविण्यावर प्रेम करणे.
- *Phile* = (as in "anglophile") one having a love for कशाविषयीतरी / कुणाविषयी प्रेमभाव बाळगणे.
- *Philology* = having a liking for words शब्दांवर म्हणजेच भाषेवर प्रेम करणे = भाषाप्रभुत्व मिळविणे.

[5]अर्थात हा प्राचीन अर्थ नंतर कायम राहिला नाही. अनेक तत्त्ववेत्त्यांनी आणि तात्विक विचारप्रणालीनी चा अर्थ त्या त्या कालाला सुसंगत बनविण्याचा प्रयत्न केला. प्रस्तुत ग्रीक अर्थानुसार ईश्वरास अस्तित्व आहे. पण अनेक विचारवंत निरीश्वरवादीही होते.अशा तत्त्ववेत्त्यांनी वेगळी व्याख्या करण्याचा प्रयत्न केला.विसाव्या शतकात करण्यात आलेल्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे :

- ''तत्त्वज्ञान हा एक निर्जन प्रदेश आहे''(रसेल : प्राब्लेम्स ऑफ फिलॉसॉफी.)
- ''तत्त्वज्ञान ही सतत विशिष्ट तऱ्हेचे प्रश्न विचारण्याची प्रक्रिया आहे.'' (हॅरी शोफिल्ड : दि फिलॉसॉफी ऑफ एज्युकेशन - ॲन इंट्रोडक्शन )
- ''विचारांचा विचार म्हणजे तत्त्वज्ञान'' (ॲंटनी फ्ल्यू).

[6]पायथागोरसचे शिष्य हेरॉक्लीडस, पॉन्टीकस आणि डायोजेनीस लॅरिटीयस यांच्या लेखनात हे उल्लेख आहेत, असे सिसिरो Marcus Tullius Cicero (03 January 106 BC – 07 December 43 BC) हा रोमन तत्त्ववेत्ता, राजकीय सिध्दान्तकर्ता,इतिहासकार व कवी म्हणतो.पण दुर्दैवाने ते लेखन उपलब्ध नाही.

त्यांचा उपहास करण्यासाठी आणि त्यांची हीनता स्पष्ट करण्यासाठी पायथागोरसने स्वत:ला ज्ञानी अथवा wise न समजता शहाणपणाचा प्रेमिक म्हणवून घेण्यास सुरुवात केली.या अर्थाने तो स्वत:ला ‘शहाणपणाचा प्रेमी Philosopher समजत असे.याचाच अर्थ sophist या शब्दाचा पर्याय म्हणून पायथागोरसने Philosopher शब्दाची योजना केली. आणि ज्ञानाचा दर्जा उंचावण्यासाठी Philosophy[8] हा शब्द शोधला.

‘Philosophy = Love of Wisdom = प्रज्ञानाविषयी प्रेम ’ असे समीकरण पायथागोरसने केले, त्यामागे एक कारण आहे.त्या कालात ऑलिम्पियाडच्या स्पर्धा होत असत.त्या स्पर्धांसाठी येणाऱ्या माणसांना पाहून पायथागोरसने माणसांचे तीन प्रकार केले.

1) **Lovers of gain** : सर्वात खालच्या दर्जाचे लोक (गर्दी पाहून नफा कमाविण्यासाठी ) खरेदी - विक्री करणारे
2) **Lovers of honor** : स्पर्धेत भाग घेण्यासाठी येणारे लोक, हे थोडे वरच्या दर्जाचे.
3) **Lovers of wisdom** : सर्वात उच्च दर्जाचे लोक म्हणजे हा सारा खेळ पाहणारे प्रेक्षक होय.

पैशासाठी जगणाऱ्या आणि त्यासाठी जीवघेणी स्पर्धा करणाऱ्या माणसांच्या जगाकडे आणि विश्वाच्या पसाऱ्याकडे पाहणाऱ्या तटस्थ प्रेक्षकालाच पायथागोरस *Lovers of wisdom* म्हणतो.तेच खरे *Philosopher.* त्यांना जाणवणारे प्रज्ञान दैवी असते, असे पायथागोरस समजत असे.

### अ) दैवी प्रज्ञान : पायथागोरसचे मत

पायथागोरसच्या मते हे विश्व सुव्यवस्थितपणे रचले गेले आहे.ती रचना समजणे खरे तर मानवी आकलनापलिकडे आहे.तरीही दृश्य विश्व आणि मानवी मन यांचे जे काही ज्ञान माणसाला होते, त्यावरुन आपण विश्वाच्या रचनेचा अंदाज बांधू शकतो.हा अंदाज पाहता ही रचना करणारा ईश्वर हाच खरा प्रज्ञानी आहे, असे लक्षात येते.माणूस (आपण) प्रज्ञानी नाहीच.तो अशी रचना करूच शकत नाही, असे पायथागोरस मानत असे.साहजिकच सोफिस्टांना प्रज्ञानी माणूस मानण्याचे कारण नाही, असे पायथागोरसचे मत होते.

विश्व ही ईश्वराची निर्मिती व रचना आहे,याचा अर्थ माणूसही ईश्वरी निर्मितीच आहे.ईश्वर, अग्नी,वायू,इत्यादी चार मूलतत्त्वे, वनस्पती आणि प्राणी यांनी मिळून हे विश्व बनले आहे. ’प्रज्ञान’ हा केवळ ईश्वरी गुण असल्याने माणूस प्रज्ञानी असू शकत नाही. ’ईश्वरासह या विश्वातील अंतिम सत्ये भव्य असून त्यांची ज्ञानप्राप्ती करून घेणे अतिकठिण आहे.जवळपास ती शक्यच नाही.

ईश्वरच प्रज्ञानी असेल तर माणूस मुर्ख आहे काय ? तर नाही.[9] ग्रीकांच्या मते माणूसही प्रज्ञानी आहे. पण माणसाच्या प्रज्ञानाचे स्वरूप ईश्वराच्या प्रज्ञानापेक्षा भिन्न आहे.

---


[7]Sophisticated असा इंग्लीश शब्द असून त्याचा अर्थ उच्चभ्रू, शिष्ट, अंहकारी, स्वत:ला शहाणा समजणारा.

[8] शहाणपण / प्रज्ञान या अर्थाने *Philosophein* हा शब्द सर्वप्रथम अथेन्सचा राजकारणी धुंरधर नेता पेरिक्लीस (इ.स.पू.493 ते 429)याने वापरल्याचे थुसिडीडस (इ.स.पू.443 .. .) या ग्रीक इतिहासकाराचे म्हणणे आहे.त्याच अर्थाने *Philosophia* हा शब्दही वापरला गेला : रॉबिन ओस्बर्न *दि पोलिस ॲण्ड इट्स कल्चर चॅप्टर वन* पान 09 रोटलेज हिस्ट्री ऑफ फिलॉसॉफी व्हॉल्यूम वन - सी.सी.डब्ल्यू टेलर 1997

[9]माणसाचे वैशिष्ट्य असे की हे अनंत ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी माणसाला ईश्वराने बुध्दिची देणगी दिलेली आहे.ती इतर प्राण्यांना दिलेली नाही.ईश्वर प्राण्यांपैकी मानवालाच आपले दिव्य ज्ञान देतो.कारण मानवाचे मूळ स्वरूप दिव्य आहे. हे दिव्य आत्मरुप जाणण्यानेच माणूस अमर बनू शकतो. माणसात या विश्वाचे परिपूर्ण प्रतिबिंब पडले असून माणूस हा अनंत विश्वाचे लघुरुप आहे.‘जे पिंडी ते ब्रह्माण्डी ’ ही त्याची धारणा होती. आणि हे आत्मरूप जाणण्याचा मार्ग म्हणजेच तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे होय. विश्वाचे स्वरूप जाणण्याचा मार्ग म्हणजे खगोलशास्त्राचा अभ्यास , संगीत, गणित आणि विज्ञानाची आराधना करणे होय, असे पायथागोरसचे मत होय .

इ.स.पू.570 ते 495

**Pythagoras of Samos**
an Ionian Greek philosopher,
mathematician, and founder
of the religious movement
called Pythagoreanism



### ब) मानवी प्रज्ञानः अज्ञानाची कबुलीः सॉक्रेटीसचे मत

ते असे की माणूस जन्ममृत्युने बांधला गेलेला आहे.त्याच्या क्षमतांच्या तुलनेत त्याचे ईश्वराविषयीचे, विश्वा विषयीचे,विश्वातील अनेक गोष्टींविषयीचे ज्ञान मर्यादित आहे.त्यात जन्ममृत्यूच्या अज्ञानाची भर तर आहेच आहे. म्हणजेच माणूस अनेक बाबतीत अज्ञानी आहे.पण हे त्याने कबुल केले पाहिजे.व्यवहारात आपण पाहतो की अनेक माणसे स्वत:ला शहाणी समजतात, इतरांना अज्ञानी. पण मुळात माणसाचे ज्ञानच मर्यादित आहे.ते ओळखणे, हाच माणसाचे प्रज्ञान होय, अशी ग्रीकांची धारणा आहे.

थोडक्यात ईश्वरी प्रज्ञानाचे ज्ञान होवू शकत नाही आणि स्वत:चे ज्ञान तर मर्यादितच आहे; मर्यादा म्हणजे अनेक बाबतीत अज्ञान असणे.तेंव्हा स्वत:च्या अज्ञानाचे ज्ञान असणे हाच *मानवी प्रज्ञान* होय. आपली मर्यादा कबूल करण्याची माणसाची ही विनम्रताच तर त्याच्या 'प्रज्ञानी' असण्याचे प्रसादचिन्ह आहे. पायथागोरसची ही भूमिकाच नंतर ग्रीक तत्त्वज्ञानाचा मुगुटमणी सर्वश्रेष्ठ तत्त्ववेत्ता सॉक्रेटीसची (इ.स.पू.469- 399 ) अधिकृत भूमिका बनली. म्हणूनच तर हा तत्त्वज्ञ स्वत:ला नम्रपणे अज्ञानी समजतो. तो म्हणतो *"I do not think, I know ; what I do not know"*[10] मी असा विचार करीत नाही की, मला जे माहित नाही ते मला माहित आहे " याचा अर्थ असा की मला काहीही ज्ञान नाही आणि असलेच काही ज्ञान तर मला माझ्या अज्ञानाचे ज्ञान आहे " अशा स्पष्ट शब्दात अज्ञान कबूल करणारा सॉक्रेटीस हा जगातील शहाणा माणूस आहे. (आजही ! )


वेगळ्या भाषेत सांगावयाचे तर ग्रीकांचे म्हणणे असे की माणसाकडे त्याची स्वत:ची बुध्दि आहे.तो ती पूर्णपणे पणाला लावतो आणि ज्ञानप्राप्ती करुन घेतो. मात्र त्याच्या पहिल्या ज्ञानाचा विषय त्याचे *अज्ञान* हाच असला पाहिजे. एकदा स्वत:चे अज्ञान त्याला कबूल झाले की मग तो ज्ञानाच्या शोधार्थ निघेल.या प्रवासात ज्ञानदेवीची याचना करुन जे काही त्याच्या भिक्षापात्रात पडते त्यातून तयार होते ती त्याची *' स्वत:च्या शहाणपणाची '*च गोष्ट.

मानवी शहाणपणाची ही गोष्ट त्याने स्वत:च्या विवेकबुध्दिने उत्स्फूर्तपणे आणि सत्यप्राप्तीसाठी जाणता - अजाणता केलेली धडपड आहे.त्याची विवेकशक्ति ईश्वरी नसून नैसर्गिक आविष्कार आहे.आपल्या बुध्दिला अपार कष्ट करायला लावण्यात माणसाने माणूस म्हणून वेगळा मानवी शहाणपणाच सिध्द केला आहे.याच अर्थाने तत्त्वज्ञान ही त्याची ज्ञानयात्रा व जीवनयात्रा आहे.माणसाचा शहाणपणा सत्याच्या शोधासाठी आहे. सत्य हेच माणसाचे अंतिम ध्येय असले पाहिजे, सत्यासाठी माणसाने प्राणाची बाजीही लावण्यास तयार असले पाहिजे, हा त्यांचा आग्रह आहे.

---

[10] एका प्रसिध्द राजकारणी माणसाकडे सॉक्रेटीस गेला.त्यांची प्रश्नोत्तरे झाली त्यावेळी सॉक्रेटीसने जो विचार केला तो असा " या माणसापेक्षा मी शहाणा आहे.कदाचित असे असेल की जाणण्यासारखे काही आम्ही दोघेही जाणत नसूच, पण त्याला असे वाटते की त्याला काहीतरी माहित आहे पण वास्तवात त्याला माहित नाही. (आता,) मला (तर ) हे ही मला माहित नाही की मला माहित आहे की नाही. या संदर्भात या मर्यादेपर्यंतच त्याच्यापेक्षा मी शहाणा आहे. मी शहाणा आहे, मी असा विचार करीत नाही . (फक्त) मी असे म्हणत आहे की मला जे माहित नाही ते (मात्र) मला माहित आहे " (म्हणजेच मला काय माहित नाही, ते मला माहित आहे ) ॲपॉलॉजी 21e

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052



सॉक्रेटीस (इ.स.पू.469- 399)



DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

थोडक्यात, --

अ)ग्रीकांच्या मते प्रज्ञान (Wisdom) हा केवळ ईश्वराचाच गुण असतो. या विश्वाचा निर्मिक, सर्वज्ञ,सर्व शक्तिमान,विश्वाचा चक्रवर्ती इत्यादी स्वरुपाचे असण्यातच परमेश्वराचे प्रज्ञान दडलेले आहे. हे असे उदात्त स्वरुप हाच ईश्वराचे 'प्रज्ञान' (Wisdom) आहे.' प्रज्ञान ' हा दैवी गुण असल्याचे भान ज्यांना येते ती माणसे म्हणूनच अतिशय सावध भूमिका घेतात : ती माणसे स्वत:ला 'प्रज्ञानी माणसे' (Wise men) समजत नाहीत तर केवळ *प्रज्ञानाचे प्रेमिक' (The Lover of Wisdom = Philosopher)* म्हणवून घेतात. या अर्थाने ग्रीक परंपरेत इतिहासकार ज्याला Philosopher समजतात तो पहिला ग्रीक विचारवंत म्हणजे, - थेल्स Thales (इ.स.पू.625 ते 647).



थेल्स Thales (इ.स.पू.625 ते 647).

ब ) माणूसही प्रज्ञानी आहे.अर्थात त्याचे स्वरूप वेगळे आहे. प्राण्याकडे प्रज्ञान असू शकत नाही ' प्रज्ञान ' हे मानवी व्यक्तीकडेच असणारे वैशिष्ट्य आहे.पण म्हणून माणसात सुध्दा प्रत्येक व्यक्ती प्रज्ञानी असेल असे नाही. काहीजणच प्रज्ञानी असतात.बहुतेकजण स्पर्धेत उतरलेले असतात. या काटेकोर अर्थाने असे म्हणता येईल की ' मानवी प्रज्ञान म्हणजे सारासार विवेक, सारासार विचार,तारतम्य,commonsense' होय. त्यात न्याय, प्रेम, करुणा, ज्ञान सहिष्णुता ,वैचारिक उदारता अशा सदगुणांचा प्रज्ञानात सामावेश असतो.

**(B) तत्त्वज्ञान :**

| | | |
|---|---|---|
| तत्त्वज्ञान | = | तत्त्व + ज्ञान |
| तत्त्व | = | 'तत्' - मूळ धातू |
| तत् | = | ते |
| तत्चा तत्पणा | = | तत्त्व |
| तत्चे ज्ञान | = | तत्त्वाचे ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान |
| तत्चे ज्ञान | = | त्याचे ज्ञान ( ज्ञानाच्या विषयाचे ज्ञान ) |

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

तत्त्व म्हणजे पदार्थाचे यथार्थ स्वरूप किंवा सार
म्हणून तत्त्वज्ञान म्हणजे यथार्थ ज्ञान !

हे लक्षात घेता तत्त्वज्ञान म्हणजे कोणत्याही अभ्यासविषयाच्या यथार्थ स्वरूपाचे किंवा त्याच्या साराचे (essence) ज्ञान होय. तत्त्वज्ञान हा या बुध्दिचा विलास आहे. 'प्रज्ञान' शब्दाचा आजचा अर्थ तत्त्वचिंतन , तर्कशास्त्र, विज्ञान, वैद्यक ज्ञान,नीतिशास्त्र,सामाजिक विज्ञाने, मानसशास्त्र आणि धर्म यांचे अध्ययन असा केला जातो.प्राचीन काळात ही सर्व ज्ञानक्षेत्रे तत्त्वज्ञान या नावानेच ओळखली जात होती.जो कुणी ते शिकत अथवा शिकवत त्यांना philosopher म्हंटले जाई. तत्त्वज्ञान या साऱ्याचा विचार करते, याचा अर्थ 'विचार करणे ' या घटनेचाच ते विचार करते.



## Philosophy चे समानार्थाक प्रतिशब्द

Philosophy या इंग्रजी शब्दाचा प्रतिशब्द म्हणून मराठी व अन्य काही भारतीय भाषांमध्ये ' तत्त्वज्ञान ' हा शब्द वापरला गेला आहे.तर हिंदीत व अन्य काही भाषांमध्ये 'दर्शन ' अथवा ' दर्शनशास्त्र ' हा शब्द वापरला गेला आहे.पण हे लक्षात ठेवले पाहिजे की हे सारे Philosophy चे नेमके प्रतिशब्द नाहीत.पण या शब्दांमुळे तत्त्वज्ञान या विषयाच्या विविध पैलूंवर प्रकाश पडतो.हे शब्द संदर्भानुसार वापरले गेले आहेत. त्याच संदर्भात ते योग्य ठरतात.हे एकूण तीन शब्द व त्यांचे संदर्भ पुढीलप्रमाणे :

(1) तत्त्वज्ञान : दर्शन / दर्शनशास्त्र :

भारतीय तत्त्वज्ञानास उद्देशून 'दर्शन' शब्द वापरला जातो.जसे वेदान्त द्र्शन, योग दर्शन.भारतीय तत्त्वज्ञान विविध विचारधारांमध्ये किंवा विचारप्रणालींमध्ये विभागले गेले आहे. या प्रणालींनाच 'दर्शन' असे नाव आहे.त्यांनाच इंग्रजीत **System** असे नाव आहे. या अर्थाने पाहाता 'भारतीय तत्त्वज्ञान' असे Indian Philosophy चे भाषांतर म्हणून न वापरता, न म्हणता भारतीय अर्थाने भारतीय चिंतनास 'भारतीय दर्शने' किंवा 'भारतीय दर्शनशास्त्रे ' म्हंटले पाहिजे. दर्शन म्हणजे दृष्टिकोन.

समग्र वस्तुस्थितीचे नेमके स्वरूप काय आहे ? या वस्तुस्थितीचे ज्ञान कोणत्या प्रमाणांनी म्हणजे साधनांनी होवू शकेल ? मानवी जीवनाची इतिकर्तव्यता कशात सामावलेली आहे ? मानवी जीवनाचे अंतिम ध्येय कोणते ? ते साध्य प्राप्त करून घेण्याचा मार्ग कोणता ? या साऱ्याविषयीचा समग्र दृष्टिकोन म्हणजे दर्शन होय.अशा विविध दृष्टिकोनांची चर्चा ज्यात केली जाते ते शास्त्र म्हणजे दर्शनशास्त्र होय.भारतीय तत्त्वज्ञानाची माहिती देणारी शास्त्रे ती दर्शनशास्त्रे होय. दर्शनशास्त्रे म्हणजे तत्त्वज्ञान',असे म्हणण्याचे कारण तत्त्वज्ञान म्हणजे तत्त्वांचे ज्ञान असे समीकरण आहे.त्यामुळेच संस्कृत साहित्यात आणि चिंतनविश्वात तत्त्वज्ञानाची व्याख्या ***"तत्त्वज्ञानसाधनशास्त्रदर्शनम्"'*** अशी केली गेली आहे.

भारतात तत्त्वज्ञानाचा अभ्यास आणि विकास, दर्शनांच्या म्हणजे तात्त्विक प्रणालीच्या माध्यमातून झाला.पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा विकास असा दर्शनाच्या माध्यमातून झाला नाही.त्यामुळे दर्शनशास्त्र हा शब्द भारतीय तत्त्वज्ञानालाच चपखलपणे लागू होतो, पाश्चात्य तत्त्वज्ञानाला नाही.

(2) तत्त्वज्ञान : सारतत्त्वाचे ज्ञान

वर म्हंटल्याप्रमाणे भारतीय वैचारिक परंपरेत तत्त्व हा शब्द कोणत्याही गोष्टीचे सारतत्त्व या अर्थाने वापरला गेला आहे.या शिवाय तत्त्व हा शब्द 'मूल्य' किंवा 'मूल्यवान गोष्ट किंवा महत्वाची गोष्ट' याही अर्थाने वापरला जातो.म्हणून तत्त्वज्ञाना म्हणजे विविध महत्वाच्या गोष्टींचे ज्ञान, मूल्यांचे ज्ञान किंवा वस्तुस्थितीच्या यथार्थरूपाचे ज्ञान होय. या यथार्थरूपालाच सार (essence) असे म्हंटले गेले. म्हणून तत्त्वज्ञान = सारतत्त्वाचे ज्ञान असा ही अर्थ होतो.

(3) तत्त्वज्ञान : ब्रह्मज्ञान

भारतीय दर्शनशास्त्रात वेदान्त दर्शन हे एक दर्शन आहे. या वेदान्ताला अनुसरून तत्त्वज्ञानाची मर्यादित कल्पना मांडली जाते.ब्रह्म हे एकच अंतिम तत्त्व असून त्याचे ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान , म्हणून तत्त्वज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान होय, अशी ती

DEPARTMENT OF PHILOSOPHY, SANGAMNER COLLEGE

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

कल्पना वेदान्तात मांडली आहे.पण हा मर्यादित अर्थ आहे.याची दोन कारणे आहेत. एक असे की बौध्द दर्शनासारखी काही दर्शने ब्रह्म ही संकल्पना स्वीकारत नाहीत. दुसरे असे की Philosophy या इंग्रजी शब्दाचा पर्यायी शब्द म्हणून तत्त्वज्ञान शब्द वापरला जातो, त्यावेळी ब्रह्मज्ञान हा अर्थ संकुचित होतो.म्हणूनच तत्त्वज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान हा 'तत्त्वज्ञान ' शब्दाचा अर्थ नाही. तो फार तर एक दृष्टिकोन होईल. तत्त्वज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान असे म्हणणे चुकीचे, दिशाभूल करणारे होवू शकते, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

'तत्त्वज्ञान Philosophy - एक संकल्पना :

येथे हे लक्षात येईल की हे सारे विवेचन तत्त्वज्ञान या शब्दाचे आहे खरे; पण 'तत्त्वज्ञान' किंवा 'Philosophy' हे केवळ शब्द नाहीत. तर ती संकल्पना आहे.शब्द वेगवेगळ्या भाषेतील असले तर संकल्पना एकच असते.या संकल्पनेचेच रूपांतर कसे होत गेले, त्याचे अर्थ कसे बदलत गेले, आणि आजचा आधुनिक अर्थ या संज्ञेला कसा लाभत गेला, ती कशी समृध्द होत गेली ; ते समजावून घेतले पाहिजे.



## 1.1.1 : तत्त्वज्ञानाच्या व्याख्या

Philosophy व तत्त्वज्ञान या शब्दांची व्युत्पत्ती व अर्थ पाहाता व्याख्या करणे फारच जोखीमीचे व दिशाभूल करण्यासारखेच असते. टिंगलटवाळी करणारे लोक तर 'तत्त्वज्ञान म्हणजे सगळे काही किंवा काहीच नाही' असेही म्हणतात.[11] ईश्वरी ज्ञान ते सारासार विवेक अशी व्याख्या करण्यात येते. ॲटनी फ्ल्यू या तत्त्वज्ञाच्या मते "विचारांचा विचार करणे हेच तत्त्वज्ञान " होय. काही महत्वाच्या व्याख्या पुढील प्रमाणे :

1. तत्त्वज्ञान म्हणजे दृश्य विश्वाच्या बुडाशी असलेल्या अंतिम सत्याविषयीचा अभ्यास होय.

प्राचीन ऋषिमुनींनी या जगाचे निरीक्षण केले. त्यांना असे आढळले की, प्रत्येक प्राणी अथवा वस्तू आपल्या अस्तित्वासाठी दुसऱ्या कशावर तरी अवलंबून असते. उदा. ज्या वहीत आपण लिहीत आहोत ती कागदाच्या लांबलचक ताग्यावर अवलंबून आहे. तो तागा लाकडी भुश्याच्या लगदयावर,भुसा लाकडावर, लाकूड जंगलावर, जंगल पृथ्वीवर, पृथ्वी तिच्या अस्तित्वासाठी सूर्यावर आहे (म्हणजे होती ). तो सूर्य त्याच्या निर्मितीसाठी महासूर्यावर, तो महासूर्य महा-महासूर्यावर.. .. यानुसार प्रत्येक प्राणी आपल्या अस्तित्वासाठी आपल्या माता पित्यावर,ते मातापिता त्यांच्या त्यांच्या मातापित्यावर ; ते त्यांच्या .. , ते ही त्यांच्या त्यांच्या .. .. अवलंबून असतात. अशाप्रकारे आपण अगदी पहिल्या मातापित्यापर्यंत येऊन पोहचतो. पण अखेरीस त्यांच्याही मात्यापित्याचा प्रश्न येतो. आणि पुन्हा प्रत्येकाच्या मातापित्याचा प्रश्न उरतोच. असे अनंतकाळ मागे गेले तरी प्रश्न सुटत नाही !!

मग आदिमानव कसा निर्माण झाला ? ती पृथ्वीवरील पहिली मानवी व्यक्ती स्त्री होती की पुरुष ? पुरुष असेल तर स्त्री कोठून आली ? स्त्री असेल तर पुरुष कोठून आला ? पहिला पुरुष असेल तर पुरुषच का निर्माण झाला ? स्त्री का नाही ? जर स्त्री असेल तर स्त्रीच का निर्माण झाली ? बरे कुणीही असले असो त्यास कुणी निर्माण केले ? तो ईश्वर म्हणता येईल का ? मग ईश्वराने जग का निर्माण केले ? असे प्रश्न निर्माण होतात .हे सर्व प्रश्न तत्त्वज्ञानात्मक आहेत.

अशाप्रकारे सर्व सजीव आणि निर्जीव जगत अस्तित्वासाठी 'कशावर' तरी अवलंबून असते. या कारणांच्या साखळीत अंतिम टप्प्यांवर असे काहीतरी असले पाहिजे की 'जे स्वत:च्या अस्तित्वासाठी कशावरही अवलंबून नाही , पण ज्याच्यावर सर्वकाही अवलंबून आहे'. अशा अंतिम तत्वाला भारतीय तत्त्वज्ञान 'ब्रह्म' असे नाव देते. हे ब्रह्म जो जाणतो तोच खरा ब्राह्मण ! पाश्चात्य तत्त्वज्ञानात अशीच संकल्पना मांडली असून त्या अंतिम तत्वास पाश्चात्य विचारवंत 'अंतिम सत्य'

[11]ए.सी. ईविंग *दि फन्डामेंटल क्वेश्चन्स ऑफ फिलॉसॉफी* पान 09 आरकेपी 1954.

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052



(Ulitmate Reality) म्हणतात. या सत्याचे ज्ञान म्हणजे सत्याचा शोध,सत्याचे प्रेम.त्याचेच चिंतन,मनन आणि अभ्यास म्हणजे तत्त्वज्ञान,असे साधारणपणे म्हणता येईल.

या अंतिम तत्त्वालाचा ईश्वर असेही म्हंटले जाते.तोच या जगाचे आदिकारण किंवा मूळ कारण समजला जातो.हे विश्व,मानव, प्राणी तोच निर्माण करतो.जन्ममृत्यू तोच देतो, असे समजले जाते.अशा रितीने या अंतिम सत्याचा अथवा ईश्वराचा अभ्यास म्हणजे तत्त्वज्ञान होय.

## 2. तत्त्वज्ञान म्हणजे विश्वाचे एकत्रित अवलोकन होय.

हे विश्व अनेक वस्तू,पदार्थ,घटना,प्राणी आणि व्यक्ति या विविध घटकांनी बनलेले आहे.हे घटक विश्वात केवळ टाकलेले नाहीत.त्यांच्यात काहीतरी कार्यकारणसंबंध आहे,नाते आहे.प्राणी चेतनामय आहेत तर वस्तु,घटना जड आहेत.अंतिम सत्य किंवा कारण जर एकच असेल तर असे परस्परविरुध्द गोष्टी निर्माण कशा झाल्या? त्यांच्यात सुसंगती कशी शोधावी ? मग विश्व चैतन्यमय आहे की जड आहे ? असा प्रश्न पडतो.

शिवाय ज्या विविध गोष्टी आजूबाजूला दिसतात त्यांच्यात काही संबंध आहेत, हे खरेच.पण हे संबंध आंतरिक आहेत की बाह्य ? दोन वस्तूंमधील संबंध आणि दोन व्यक्तिमधील संबंध एकच असतो की भिन्नभिन्न ? उष्णता आणि मेण यांचा संबंध वितळणे असा दिसतो.पण अहमदनगर ते मुंबई व्हाया नासिक हा कसला संबंध आहे? व्यक्तिमधील प्रेम या संबंधाचे स्वरुप काय ? ते देशप्रेमासारखे , मानवप्रेमासारखेच असते का ?

कारण नावाचे तत्त्व खरेच असते का ? की एकामेकामागे काही घटना घडत असतात एवढेच ? सूर्य मावळणे हे सूर्य उगवण्याचे कारण आहे का ? की कारण ही आपली व्यक्तिगत भावना आहे ?अशा विविध प्रकारच्या परस्परविरोधी गोष्टींकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहणे, त्यांचे अवलोकन करणे हेच तत्त्वज्ञान होय.

## 3. तत्त्वज्ञान म्हणजे अंतिम प्रश्नांशी झटपट.कोणतेही गृहीतक नाही

तत्त्वज्ञानात्मक प्रश्न अंतिम असतात. याचा अर्थ असा की त्या नंतर त्याबाबत कोणताही प्रश्न उपस्थित करता येत नाहीत. अशा प्रश्नांची उत्तरे मिळतातच असे नाही.पण प्रश्न विचारत जाणे ही तात्त्विक प्रवृत्ती असून ती अंतिम प्रश्नांचा शोध घेते.

उदाहरणार्थ ज्ञान म्हणजे काय ? मूल्य म्हणजे काय ? नैतिकता म्हणजे काय ? काल म्हणजे काय ? कालाची सुरुवात कधी झाली ? कालाला आदिअंत असतो का ? फुलाला गंध असतो.यात फूल हे द्रव्य आहे आणि रंग,गंध,स्पर्श हे गुण असतात.द्रव्य ( फूल ) नसताना हे गुण राहू शकतील काय ? ईश्वर म्हणजे काय ? ईश्वर जगाचा निर्माता असेल तर ईश्वराचा निर्माता कोण ? हे व असे अंतिम प्रश्न तत्त्वज्ञानात अभ्यासले जातात.काहीही गृहीत धरावयाचे नाही.सतत प्रश्न विचारीत जावयाचे आणि अंतिम प्रश्नाकडे पोहोचावयाचे हे तत्त्वचिंतनाचे सूत्र असते.

## 4. तत्त्वज्ञानाची आधुनिक व्याख्या : तत्त्वज्ञान म्हणजे संकल्पनांचे विश्लेषण होय.

विश्लेषण म्हणजे पृथ्थकरण.एखादी वस्तु एकापेक्षा अधिक घटकांची,अवयवांची किंवा भागांची असू शकते.वस्तूंतील या तीन गोष्टीना वेगळे करण्याची प्रक्रिया म्हणजे विश्लेषण होय.(आणि सर्व घटक पुन्हा योग्य रितीने जुळविणे म्हणजे संश्लेषण होय.) विश्लेषणामुळे त्या वस्तूचे ज्ञान होणे सोपे जाते.उदाहरणार्थ H2O म्हणजे हैड्रोजनचे2 अणू आणि ऑक्सिजनचा **1** अणू = पाणी.मनाचे विश्लेषण केले असता भावना,वासना,इच्छा,बुध्दि,विचार असे घटक आढळतात.

असे विश्लेषण तत्त्वज्ञानात करणे म्हणजे 'तात्त्विक विश्लेषण' होय.तात्त्विक विश्लेषण ही तत्त्वज्ञानाची एकमेव व योग्य पध्दत आहे, असे मानणारा सिध्दान्त म्हणजे 'विश्लेषणवाद' होय. विश्लेषणाचा तात्त्विक सिध्दान्त वेगवेगळ्या देशात विविध तत्त्वज्ञांनी मांडला. त्या सिध्दान्तांच्या समूहाला *'विश्लेषक तत्त्वज्ञान'* म्हणतात. .तात्त्विक विश्लेषण हा सिध्दान्त नसून ती एक विश्लेषणाची शैली आहे.

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

तत्त्वज्ञानाची विचार करण्याची पध्दती म्हणून विश्लेषण हे तत्त्वज्ञानाच्या इतिहासाइतकेच जुने (तीन हजार वर्षे) आहे.पण विसाव्या शतकात अमेरिका,इंग्लंड व स्कॅंडिनेव्हीया या देशात प्रभावी बनले.मानसशास्त्राच्या क्षेत्रात सिग्मंड फ्राईड या मानसशास्त्रज्ञाने मनोविश्लेषण पध्दत आणली.तसेच ती भौतिक आणि रसायनशास्त्रातही वापरली गेली.तेंव्हापासून ती तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातही आणली गेली.विसाव्या शतकात जी.ई.मूर, बर्ट्रांड रसेल या तत्त्ववेत्त्यांनी विश्लेषणाला तात्विक दृष्टिकोनाचा दर्जा देवून ती 'पध्दती' बनविली.त्याच्यात नंतर विट्गेन्टाईन या तत्त्ववेत्त्यांने मोठी भर घातली.सध्याच्या कालात विश्लेषणात तर्कशास्त्राला आणि भाषिक विश्लेषणाला महत्व आहे.त्यामुळे विश्लेषणाचे *'तार्किक विश्लेषण' (Logical Analysis )* आणि *'भाषिक विश्लेषण ' (Linguistic Analysis)* असे मुख्य दोन प्रकार आहेत.



## 1.1.2 : तत्त्वज्ञानाचे स्वरूप

तत्त्वज्ञानाचे स्वरुप आपणांस व्युत्पत्ती आणि व्याख्यांवरुन लक्षात आले आहेच.आता त्याचे स्वरुप आणखी स्पष्ट व्हावे यासाठी काही तुलना करणे आवश्यक आहे.ही तुलना विज्ञान व धर्माशी केली पाहिजे.त्यासाठी आधी आपण विज्ञान म्हणजे काय ते पाहू.

### विज्ञान म्हणजे काय ?

विज्ञान म्हणजे विशेष ज्ञान. विशिष्ट पध्दतीने मिळविलेले ज्ञान म्हणजे विज्ञान होय.या पध्दतीला वैज्ञानिक पध्दती म्हणतात. निरीक्षण आणि प्रयोग करणे ही ती पध्दती आहे.सर्व अधांतरी वस्तू पृथ्वीकडे खेचल्या जातात, हे निरीक्षणाने आणि प्रयोगचा पडताळा घेतल्याने समजते.निरीक्षण करताना आपले राग,लोभ,भीती या भावना बाजूला ठेवाव्या लागतात.वस्तुनिष्ठ रितीने वैज्ञानिक पध्दती अवलंबिणे म्हणजे वैज्ञानिक वृत्ती होय. विज्ञान नेहमी सर्वसामान्य नियम शोधते. ते सार्वत्रिक व सार्वकालिक असतात.ते अपरिवर्तनीय असतात.

### (अ) तत्त्वज्ञान आणि विज्ञान : फरक व परस्परसंबंध.

विज्ञान नेहमी घटनेचा तपशील शोधते.उदाहरणार्थ भौतिकशास्त्र जगाचा अभ्यास करते. पण 'हे जग काय आहे ? ' असा प्रश्न ते विचारत नाही. तो तत्त्वज्ञानाचा प्रश्न असतो.या जगाला काही हेतू आहे का ? की नाही? हे तत्त्वज्ञानाचे प्रश्न असतात? म्हणजेच विज्ञान कारणाचा शोध घेते तर तत्त्वज्ञान कारण याच गोष्टीचा शोध घेते.

याचा अर्थ असा की विज्ञान 'कसे'चे उत्तर देते, 'का?' चे उत्तर ते देत नाही. तत्त्वज्ञान 'का?' चे उत्तर देते.विज्ञान अनेक गोष्टी गृहीत धरते तर तत्त्वज्ञान काहीच गृहीत धरत नाही.ते चिकित्सा करते.म्हणून ते अंतिम प्रश्नापर्यत जाते.तत्त्वज्ञान विज्ञानासारखे केवळ अनुभवावर अवलंबून राहात नाही तर ते अनुभवापलिकडे जाते. मुक्त चिंतन करते.

तत्त्वज्ञान प्रश्न विचारीत जाते.प्रश्नाचे उत्तर मिळाले की तो प्रश्न तत्त्वज्ञानातून बाजूला होतो.त्याचे विज्ञान बनते.मग तत्त्वज्ञान त्यापुढील प्रश्न विचारते. जर पुन्हा उत्तर मिळाले की पुन्हा त्याचे नवे विज्ञान तयार होते. मग तत्त्वज्ञान पुन्हा नवा प्रश्न विचारते.असे सतत घडत जावूनच तत्त्वज्ञान अंतिम प्रश्नापर्यंत जावून पोहोचते जिथे उत्तर मिळत नाही.तिथून तत्त्वचिंतन सुरु होते.एका अर्थाने विज्ञानाला तत्त्वज्ञानच जन्माला घालते. म्हणूनच तत्त्वज्ञानाला 'विज्ञानाची आई' म्हटले आहे.

### (ब) तत्त्वज्ञान आणि धर्म : फरक व परस्परसंबंध.

### धर्म म्हणजे काय ?

धर्म या शब्दाचा मूळ अर्थ लोकांना एकत्रित आणणारा नियम असा आहे.ते भौतिक तत्त्व आहे.धर्म आणि धार्मिक वृत्ती एकच असते.पण धर्म व धर्मसंस्था यात फरक आहे.धर्म ही व्यक्तिगत भावना आहे तर धर्मसंस्था ही सार्वजनिक गोष्ट आहे.धार्मिक वृत्तीचा माणूस असे समजतो की या विश्वात अनेक प्रकारच्या उच्चशक्ति आहेत, त्यांचे आपल्यावर नियंत्रण आहे,त्या आपले बरेवाईट करु शकतात.त्यामुळे तो त्यांना शरण जातो,तिची प्रार्थना करतो.त्या शक्तिसमोर लीन होतो.या सर्व

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



शक्तिसुध्दा अखेरिस एका व्यापक सर्वशक्तिमान,चैतन्यमय शक्तिच्या नियंत्रणात असून तीच अंतिम शक्ति सत्य,सुंदर,शिव आहे.तिची प्राप्ती हेच मानवी जीवनाचे श्रेय आहे.

काहीजण धर्म या शक्तिलाच ईश्वर मानतात तर काही धर्म ईश्वराला मानीत नाहीत.पण असे निरीश्वरवादी धर्म नैतिकता मानतात.मूल्ये स्वीकारतात.मूल्यांनाच ते धर्म मानतात.उदा.बौध्द,जैन.

अंतिम सत्याचा शोध हे एकच ध्येय धर्म आणि तत्त्वज्ञान दोघेही स्वीकारतात. पण त्यांचे मार्ग भिन्न आहेत.धर्म श्रध्देच्या मार्गाने तर तत्त्वज्ञान चिकित्सेच्या मार्गाने जातो.धर्माची तत्त्वे गूढ अनुभूतीने कळू शकतात तर तत्त्वज्ञान गंभीर चिंतनानेच लाभते.तत्त्वज्ञान विज्ञानाला जन्म देणारे असल्याने ते काटेकोर असते. ते प्रथम अनुभवावर विश्वास ठेवते.अंधश्रध्दांना वगळते.ते सतत विकसनशील असते.बदलत राहाते.तर धर्म ताठर,न बदलणारा आणि श्रध्दा व अंधश्रध्दा यात फरक न करणारा असतो. तो ज्ञान निर्माण करु शकत नाही.समाजाला तो बदलू शकत नाही.तत्त्वज्ञान समाज परिवर्तन करते,सुधारणा करते.समाजाचा विकास करते.

## 1.2 : तत्त्वज्ञानाच्या शाखांचा परिचय

Philosophy (Love of Wisdom) आणि ब्रह्मज्ञान या शब्दांमधून तत्त्वज्ञानाचा अभ्यास विषय स्पष्ट होतो, हे खरे. पण तो पुरेसा स्पष्ट होत नाही.आपण गणित, इतिहास, जीवशास्त्र, अर्थशास्त्र, हिंदी, संस्कृत, उर्दू, इंजिनिअरींग, पेंटींग, चित्रकला इत्यादी विविध विषयाचा अभ्यास करतो. प्रत्येक विषयाचा एक स्वतंत्र अभ्यास विषय असतो. अर्थशास्त्र समाजातील आर्थिक रचनांचा व घडामोडींचा अभ्यास करते. भौतिकशास्त्र, भौतिक नियम शोधते तसा तत्वज्ञानाचा अभ्यास विषय कोणता ?

तत्वज्ञान कशाचा विचार करते? कशाचे चिंतन करते? त्या चिंतनाचे स्वरुप काय? तर कोणत्याही विषयाचे मूलभूत विचार म्हणजे तत्वज्ञान असे म्हणता येते.एका दृष्टिने असे म्हणता येईल की तत्त्वज्ञानाला विषयाचे बंधन नसते.कोणत्याही विषयाचे मुळापासून चिंतन करणे,त्याची सखोल चिकीत्सा करणे, त्या विषयाच्या सर्वसामान्य स्वरूपाचे चिंतन करणे म्हणजे *त्या विषयाचे तत्वज्ञान* असे म्हणता येईल.

गेल्या काही शतकांमध्ये तत्त्वज्ञानाने जे चिंतन केले त्याचे वर्गीकरण केले तर हे चिंतन मुख्यत: चार विषयविश्वांचे आहे.त्यानुसार तत्वज्ञानाच्या शाखाही तयार झाल्या आहेत. हे विषय आणि या शाखा पुढीलप्रमाणे :

| अनुक्रम | तत्त्वज्ञानाचे विषय | तत्त्वज्ञानाच्या शाखा |
|---|---|---|
| 01 | विचारांचे नियम | **1.तर्कशास्त्र** (Logic) |
| 02 | ज्ञानाचे स्वरूप व निकष | **2.ज्ञान शास्त्र** (Epistemology) |
| 03 | दृश्य विश्व, विश्वातील पदार्थ व विश्वाबाहेरील तत्त्वे - परतत्त्वे | **3.सत्ता शास्त्र** (Metaphysics) |
| 04 | मूल्ये | **4. नीति शास्त्र** (Ethics)<br>**5.सौंदर्य शास्त्र** (Aesthetics) |

यांचा परिचय आपण करून घेवू :

### (1)तर्कशास्त्र: विचारांचे नियम : (Logic)

माणूस हा विचार करणारा प्राणी आहे.आपण सारेच विचार करतो.वस्तुस्थिती केवळ निरीक्षणाने समजून घेतो असे नाहीत, तर त्यावर विचार करुन काही निष्कर्ष काढतो.पण बेशिस्त विचार म्हणजे विचार नाही.विशिष्ट पध्दतीने शिस्त व

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052



विचाराचे नियम पाळून विचार मांडला तरच त्यातून काहीएक निश्चित विचार व कृती शक्य होते.त्यासाठी विचार कसा करावा,याचाही विचार करावा लागतो.असे विचाराचे शास्त्र म्हणजे तर्कमीमांसा.

दैनंदिन जीवन जगतांना आपण सतत वेगवेगळे अंदाज व्यक्त करतो. हवामान, पाऊसपाणी,राजकीय - सामाजिक घडामोडी, कौटुंबिक हालचाली इत्यादींचा अंदाज केला जातो.चांगला पाऊस झाला तरच स्वस्ताई होईल हा अंदाज आहे. पण सर्व अंदाज खरे असतात,असे नाही . अतिरिक्त पाऊस झाला तर नुकसान होऊ शकते. म्हणून अंदाज आणि तर्क यात फरक केला जाते. चांगला योग्य व अचूक तर्क कसा करावा , याचे शास्त्र म्हणजे तर्कशास्त्र. तर्क म्हणजे अचूक अंदाज . आपला सर्व व्यवहार तर्कावर अवलंबून असतो. बेकारीमुळे गुंडगिरी वाढते, सर्व अधांतरी वस्तू जमिनीवर पडतात, टंचाईमुळे भाववाढ होते ; हे सर्व तर्क असतात. बेकारी आणि गुंडगिरी यांच्यातील सामाजिक , राजकीय, आर्थिक संबंध तार्कीक पध्दतीने सोडवता येतात.

योग्य व सत्य विचार कसा करावा, त्याची मांडणी कशी करावी,त्याचे नियम कोणते;त्याचे प्रशिक्षण देणारी तर्कशास्त्र ही तत्त्वज्ञानाची शाखा आहे.विचार मांडणे याचा अर्थ आपले म्हणणे सांगण्यासाठी योग्य तार्किक मांडणी करावी लागते. तिलाच 'युक्तिवाद' (Argument) असे म्हणतात. युक्तिवादाची विशिष्ट प्रकारची रचना असते.जिचा आधार घेतला जातो त्यांना आधारविधाने आणि जो निष्कर्ष काढला जातो त्यास निष्कर्ष विधान म्हणतात. आधारविधान + निष्कर्ष विधान मिळून युक्तिवाद पूर्ण होतो.

विचार योग्य तर्कावर आधारलेला असणे आणि योग्य म्हणजे युक्त असणे म्हणजे युक्त अथवा सुतर्कित असणे होय. अशा युक्ततेचे / सुतर्कितेचे नियम निश्चित करण्याचा प्रयत्न पाश्चात्य तत्त्वज्ञानात प्रथम ॲरिस्टॉटलने इ.स.पू.384 ते 322 ) या ग्रीक तत्त्वचिंतकाने केला.युक्त व सत्य विचार म्हणजे तर्क. त्याचे शास्त्र ते तर्कशास्त्र होय. ॲरिस्टॉटल हा पाश्चात्य तर्कशास्त्राचा आद्यगुरु असून त्याच्या तर्कशास्त्रास 'पारंपरिक तर्कशास्त्र'(Traditional Logic) म्हणतात. कारण ते हजारो वर्षे परंपरेने शिकविले जात होते.नंतर मध्ययुगात लॉर्ड फ्रान्सिस बेकनने (इ.स.1561-1626) नवे तर्कशास्त्र मांडले.

भारतातही अशी प्राचीन परंपरा होती.त्या नैयायिक, बौध्द व जैन तर्कपंडितांनी तर्कशास्त्राचा विकास केला. अशा रितीने तत्त्वज्ञानाची शाखा म्हणून तर्कशास्त्राचा विकास पाश्चात्य व भारतीय तत्त्वज्ञानात झाला.

हे तर्कशास्त्र दोन प्रकारचे आहे.

(अ ) विगमन / वैगमनिक तर्कशास्त्र

(ब ) निगमन / नैगमनिक तर्कशास्त्र

## (अ ) विगमन / वैगमनिक तर्कशास्त्र :

यात एखाद्या विशेष विधानावरुन साम्याच्या आधारे दुसरे एखादे विशेष विधान निष्पन्न केले जाते किंवा एकसारख्या अनेक विशेष विधानांवरुन सामान्य स्वरुपाचा निष्कर्ष काढला जातो. हे निष्कर्ष निश्चित नसतात, तर बहुधा संभावनात्मक असतात.उदाहरणार्थ एकदा एखाद्या डॉक्टरने दिलेले औषध लागू पडले, हे अनुभवल्यानंतर आपण पुढच्या वेळी त्याच डॉक्टरकडे जातो.त्यावेळी पूर्वीप्रमाणेच आताही औषध लागू पडण्याची दाट शक्यता आहे, असे संभवात्मक अनुमान असते.तसेच जिथे जिथे धूर दिसतो तिथे तिथे अग्नी आढळतो. त्यावरुन धूर तेथे अग्नी असा सामान्य निष्कर्ष आपण काढतो. जसे :

अ माणूस मर्त्य आहे.
ब माणूस मर्त्य आहे.
क माणूस मर्त्य आहे.
ड माणूस मर्त्य आहे. } आधार विधाने
प माणूस मर्त्य आहे.
फ माणूस मर्त्य आहे.
ब माणूस मर्त्य आहे.
म्हणून सर्व माणूसे मर्त्य आहेत. → निष्कर्ष विधान

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

थोडक्यात विशिष्ट उदाहरणावरून सामान्य निष्कर्ष काढणे अथवा विशिष्ट विधानावरुन सामान्य विधानाकडे जाणे म्हणजे विगमन होय. असा विगमानात्मक तर्क तो वैगमनिक तर्क होय.वि + गमन = विशिष्टाकडून पुढे (सामान्याकडे) जाणे.

### (ब) निगमन / नैगमनिक तर्कशास्त्र :

यात सामान्य विधानातून विशिष्ट विधान निष्कर्ष म्हणून मिळविले जाते.नि + गमन = सामान्याकडून विशिष्टाकडे जाणे. यात आधारविधाने सत्य व युक्त असतील तर निष्कर्ष विधान ही तसेच असते.उदाहरणार्थ ,



A)

सर्व माणसे मर्त्य आहेत
सॉक्रेटीस माणूस आहे. } आधार विधाने
म्हणून सॉक्रेटीस मर्त्य आहे. → निष्कर्ष विधान

B) राणी एकतर ग्रंथालयात अभ्यास करीत आहे किंवा मैत्रिणीबरोबर सिनेमाला गेली आहे
पण ती आता ग्रंथालयात कोठेच दिसत नाही. } आधार विधान
याचा अर्थ : ती मैत्रिणीबरोबर सिनेमाला गेली आहे. → निष्कर्ष विधान

यात असे दिसेल की आधारविधानात जे सांगितले आहे तेच निष्कर्ष विधानात सांगितले आहे. निष्कर्ष अनिवार्यरित्या सत्यच असतो. तो संभाव्य नसतो.दुसरे असे की हे दोन्ही प्रकार एकमेकांवर अवलंबून आहेत. वैगमनिकचा निष्कर्ष हा नैगमनिकचे आधारविधान असतो तर नैगमनिकचा निष्कर्ष हाच वैगमनिकचा आधार असतो.

### तर्काभास / विचारदोषच (Fallacy)

आता माणूस नेहमीच तार्किक विचार करेल,असे नाही.कधी कधी तो चुकीचा,अयोग्य विचार करतो.(खरे तर सामान्यजन नेहमीच अतार्किक, भावनाप्रधान विचार करतात.) असा विचार किंवा युक्तिवाद ऐकताना तर्कयोग्य वाटतो पण मुळात तसा तो नसतो. अशा विचारास ' तर्काभास, विचारदोष,तर्कदोष अथवा हेत्वाभास' ( Fallacy ) असे म्हणतात .असे शेकडो तर्कदोष असून त्यांचाही अभ्यास तर्कशास्त्रात होतो.तर्कदोष आपण टाळावयाचे असतात आणि इतरांना करु द्यावयाचे नसतात .

तर्कशास्त्रास इंग्लीशमध्ये Logic असा शब्द आहे.त्याचे मूळ *legein* या शब्दात असून त्यापासून ग्रीक भाषेत *logos* हा शब्द बनतो.*legein* म्हणजे सांगणे, म्हणणे.त्यामुळे ॲरिस्टॉटल *logos* ला ' विचार करणारे द्रव्य ' किंवा तर्कशक्ति *reason* म्हणतो.म्हणून Logic चा अर्थ योग्य विचार करण्यास शिकविणारे शास्त्र. Logic हा प्रत्यय लागूनच biology, zoology, anthropology, sociology, psychology, astrology, philology इत्यादी विषयांची नावे तयार होतात.या प्रत्येक विषयाला स्वत:चे तर्कशास्त्र विकसित करावे लागतेच.नुकत्याच विकसित झालेल्या संगणकशास्त्राला सुध्दा ते तयार करावे लागले.प्रत्येक ज्ञानशाखा आपले काम Logic विकसित करुनच त्यानुसारच करते.हे Logic चुकले की काम ठप्प होते ! ( गेल्या काही वर्षात काही मोटरसायकलींवर Logic असे लिहीलेले आढळेल . कारण त्या कंपनीने ते विकसित करून त्या गाडीत ते उपयोगात आणलेले असते.)

## (2) ज्ञानशास्त्र : ज्ञानाचे स्वरूप व निकष : (Epistemology)

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



आपल्याला जे काही ज्ञान होते ते कोणत्या साधनांनी होते, आपल्याला मिळणारे ज्ञान कोणत्या परिस्थितीत खऱ्या अर्थाने ज्ञान ( यथार्थ ज्ञान ) मानता येईल ? ज्ञान म्हणजे काय ? त्याचे स्वरुप कसे असते ? त्याचा निकष कोणता ? ज्ञान आणि भास यात फरक काय आहे ? ज्ञानाची प्रक्रिया कशी आकार घेते ? हे तत्त्वज्ञानातील महत्वाचे प्रश्न आहेत.

प्रत्येक क्षणाला आपल्याला कोणते तरी नवे ज्ञान प्राप्त होत असते. अर्थात आपले मन, बुध्दी व ज्ञानेंद्रीये त्या ज्ञानप्राप्तीच्या क्षणाला सजग असली पाहिजेत.अगदी, 'आत्ता किती वाजले आहेत ?' अशा कायम ताज्या व नव्या प्रश्नातून सुध्दा दर क्षणाला नवे ज्ञान मिळते.हे दृश्य जग अथवा अमूर्त भावभावना, विचार इत्यादींचे आपणास सततच ज्ञान मिळत असते. ते मिळाले की कुणाला तरी सांगावे असे वाटते.

पण दरवेळी ज्ञानच होईल, असे नसते.कधी कधी भास होतो, भ्रम होतो. अंधारात चालताना आपणास अचानक साप दिसतो. आपण दचकून पाय मागे घेतो. नंतर कळते की ती दोरी आहे . मग साप कोठे गेला ? सापाचे ज्ञान झाले होते की भास आणि भास असेल तर आपण घाबरलो का ? पाण्यातील काठी वाकडी दिसते.हे खरे की खोटे की भास ? सूर्य उगवतांना - मावळतांना दिसतो.आता उगवणे मावळणे या घटना खऱ्या की भास ? असे अनेक ज्ञानविषयक प्रश्न निर्माण होतात.मग या सर्वात फरक करण्यासाठी 'ज्ञान'या संकल्पनेची चिकित्सा करावी लागते. ते काम तत्त्वज्ञान करते.

साधारणत: माहिती व ज्ञान ( Information and knowledge ) यात फरक केला जात नाही पण तत्त्वचिंतक मात्र तो फरक करतो. किती वाजले याचे उत्तर घडयाळ बघून देता येते पण किती कसे वाजतात,याचे खरे उत्तर खगोलशास्त्रज्ञच देऊ शकतो. तत्त्वज्ञ त्यापलिकडे जावून 'काल' ही संकल्पनाच स्पष्ट करतो. आपल्या शरीराची उंची, वजन, रंग. इ. आपणास 'माहिती' असते.डॉक्टरला मात्र 'ज्ञान' असते.अन्नात चवीसाठी मीठ टाकावे, ही माहिती असते पण 'किती' टाकावे हे ज्ञान असते. अशा रितीने ज्ञान व माहिती यात फरक करावा लागतो.ज्ञानात माहितीचे विश्लेषण, स्पष्टीकरण, वर्गीकरण करणे, समर्थन करणे अभिप्रेत असते.ते माहितीत केले जात नाही. माहितीवर विश्वास ठेवला जातो, त्यातूनच अंधश्रध्दा निर्माण होते.ज्ञान त्या नाहिसे करते.

ज्ञानप्रक्रियेत ज्ञाता,ज्ञान व ज्ञेयवस्तू असे तीन घटक असतात.ज्ञाता म्हणजे ज्यास ज्ञान होते ती व्यक्ती .ज्ञेयवस्तू म्हणजे ज्याचे ज्ञान होते ती वस्तू.आणि ज्ञान म्हणजे ज्ञाता व ज्ञेयवस्तू यांच्यातील आंतरसंबंध.ज्ञान होते, म्हणजे या तिन्हीत नेमकी कोणती घटना घडते, हे स्पष्ट होणे आवश्यक असते.या सर्व समस्यांची चर्चा करणारे शास्त्र म्हणजे ज्ञानशास्त्र.

थोडक्यात ज्ञान - अज्ञान,सत्य असत्य ज्ञान व भास आणि भ्रम तसेच ज्ञानप्रक्रिया या संकल्पना स्पष्ट करण्याचे काम ज्ञानमीमांसा करते.

## (3)**सत्ताशास्त्र** : दृश्य विश्व, विश्वार्तंगत पदार्थ व विश्वातीत तत्त्वे - परतत्त्वे : Metaphysics

आता, ज्ञेयवस्तू अस्तित्वात नसेल तर तिचे ज्ञान कसे प्राप्त होईल ? त्यामुळे ज्ञानासाठी तिचे 'असणे' हवेच. म्हणूनच तिच्या अस्तित्वाचा विचार करावा लागतो.

साधारणपणे आपण असे समजतो की अस्तित्वात असणे म्हणजे विशिष्ट स्थलकालात असणे.कुठेतरी कोणत्यातरी क्षणापर्यंत मूर्तरुपात असणे.पण ज्यांना असे स्थलकाल नाही, असे काही अस्तित्वात असू शकते काय ? या अस्तित्वाचे स्वरुप काय ? ते कसे कळते ? त्याचे ज्ञान कसे होते ? असे प्रश्न निर्माण होतात. उदाहरणार्थ स्थल अस्तित्वात असते, पण 'काल' (Time) अस्तित्वात असतो काय ? थोडक्यात 'अस्तित्व' या शब्दाचा अर्थ काय ? एखादे काहीतरी अस्तित्वात असणे याचा अर्थ नेमका काय होतो ? अशा सर्व समस्याचा अभ्यास अस्तित्वशास्त्रात होतो.

'अस्तित्व' या शब्दाला संस्कृतमध्ये **सत्** म्हंटले जाते.सत् पासून सत्य,सत्ता हे शब्द बनतात.सत्य म्हणजे अशी गोष्ट की जी ''नाही', असे म्हणता येत नाही. ती 'आहेच ' असे म्हणावे लागते.म्हणून अस्तित्वास सत्य / सत्ता असे म्हंटले जाते.त्यामुळे अस्तित्वशास्त्रास ' सद्वस्तूमीमांसा / सत्तामीमांसा किंवा सत्ताशास्त्र' असाही शब्द वापरला जातो.

1) दृश्य जगत

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

2) माणूस तसेच एकूण सजीव सृष्टी
3) स्व - आत्म
4) अनुभवातीत तत्त्व : चित् किंवा ईश्वर किंवा जडतत्त्व

सोप्या भाषेत जीव, जगत, जगदीश , हे सत्तामीमांसेचे अभ्यास विषय होय . जग म्हणजे दृश्य जग , निसर्ग,तारे-तारका, चंद्र, सूर्य ,आकाश इत्यादी.( तसेच विज्ञान-तंत्रज्ञानामुळे ज्ञात होणारे अज्ञात जग ).सजीवसृष्टी म्हणजे जगताचा भाग असणारे मानवी समाज, पशुपक्षी. अनुभवातीत तत्त्व म्हणजे परतत्त्व. म्हणजेच या जगाचे अधिष्ठान असलेले तत्त्व. ते कुणाच्या मते ब्रह्म ,कुणाच्या मते ईश्वर ,कुणाच्या मते जडतत्त्व, तर कोणाच्या मते जड व चेतन यांचे द्वैत होय. थोडक्यात , -



- हे जग  काय आहे ?
- ते कुणी निर्माण केले आहे ?
- की ते मुळातच अस्तित्वात आहे ?  आणि मूळातच असेल तर त्यचा नेमका अर्थ काय ?
- की जग खरे तर अस्तित्वातच नाही पण नुसते भासते आहे ?
- जग निर्माण करणारी निर्माती शक्ती म्हणजेच ईश्वर आहे  का ?
- तशी काही शक्ती असेलच तर ती शक्ती स्त्री आहे की पुरुष ? की ती शक्ति उभयलिंगी आहे की ती निर्लिंग आहे ?

आणि समजा:

विचारशील माणूस म्हणून हे सगळे पर्यायच मी नाकारले तर काय होईल ?  'तेंव्हा इथे लक्षात हे घेणे आवश्यक आहे की, मी,समाज,जग,ईश्वर ' या संकल्पना माझ्या डोक्यात आल्याच कशा ? हे सर्व प्रश्न मूलभूत प्रश्न आहेत.हे प्रश्न तात्विक आहेत. याचा अर्थ त्यांच्या उत्तर देण्याच्या प्रयत्नातून मानवी जीवनविषयक , जगतविषयक कोणते तरी मार्गदर्शक तत्त्व मिळते.ते तात्त्विक चिंतन असते. या सर्वांचे चिंतन म्हणजे सत्तामीमांसा होय.

## अध्यात्मशास्त्र   Metaphysics

Metaphysics चे भाषांतर अध्यात्मशास्त्र असेही करण्यात येते.आत्म् म्हणजे 'आत्म' = स्वत:.अधि = पलिकडे जाणे. स्वत:च्या पलिकडे जावून व्यापक गोष्टीचा विचार करणे म्हणजे अध्यात्म होय.ज्यांचा असा विचार केला जावू शकतो त्यात समाज,समाजाची सुखदु;खे, आत्मा, धर्म, ईश्वर,अंतिम सत्य अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो.

माणसाचे सुरक्षित, संवर्धित अस्तित्व हाच खरा अध्यात्मशास्त्राचा मूळ चिंतनविषय आहे.त्यामुळे साहजिकच आस्तिकाचे (ईश्वरवाद्याचे अथवा धर्मवाद्याचे)जसे अध्यात्मचिंतन असते तसे नास्तिकाचे (निरीश्वरवाद्याचे) सुध्दा अध्यात्मशास्त्र असू शकते.त्याचबरोबर धर्मच न मानणारे निधर्मी, धर्मनिरपेक्ष किंवा ईहवाद्याचेही अध्यात्मशास्त्र असू शकते.

जनसामान्यामध्ये अध्यात्मशास्त्र म्हणून जे प्रचलित आहे ते खरे तर धर्मशास्त्र असते. ते काटेकोर अर्थाने सद्वस्तूशास्त्र किंवा तत्त्वज्ञानात्मक सत्तामीमांसा नसते.अध्यात्म, अध्यात्मिक म्हणून ज्याची चर्चा केली जाते ते त्या त्या धर्माचा प्रचार आणि प्रसार करणारे धर्मशास्त्र (Theology) असते.आणि धर्मशास्त्र म्हणजे तत्त्वज्ञान नसते.कारण धर्मशास्त्रात चिकीत्सा नसते.उलट अध्यात्मशास्त्र हा तत्त्वज्ञानाचा भाग असल्याने त्यात चिकित्सा असते. आवश्यकतेनुसार अध्यात्मशास्त्राच्या तपशीलात बदल केला जावू शकतो,ते नाकारलेही जावू शकते.

संक्षेपात : अनुभवक्षम जग (जगातील माणसे),अनुभवापलिकडचे अंतिम तत्व आणि अमूर्त संकल्पनांचे जग अशा तीनही प्रकारच्या अस्तिवाचा अभ्यास करणारी तत्वज्ञानाची शाखा म्हणजे 'सद्वस्तूमीमांसा / सत्ताशास्त्र '  होय. या

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052



संकल्पना,अंतिम तत्व , त्यांचे जग खरेच आहेत का ? त्यांचे अस्तित्व स्विकारल्यास किंवा नाकारल्यास काय घडते? अशा विविध प्रश्नांचा अभ्यास सत्ताशास्त्र करते.

## (4) नीतिशास्त्र (Ethics / Moral Philosophy )

चांगले-वाईट, योग्य- अयोग्य, उचित-अनुचित, कर्तव्य-अकर्तव्य , सद्‌गुण-दुर्गुण यासारख्या मूल्यात्मक संकल्पनांच्या आधारे नैतिक मूल्यांचा विचार केला जातो. नैतिक मूल्यांचा संदर्भात काही वेळा मूलभूत प्रश्न उपस्थित केले जातात. मुख्यत: ***चांगले म्हणजे काय ?*** हा नैतिक प्रश्न आहे. त्या आधारेच खरी तर नैतिक चर्चा होते.

उदाहरणार्थ, मी नैतिक वर्तन का करावे ? मी चांगले का वागले पाहिजे ? इतरांनी माझ्याशी वाईट वर्तन केले तरी मी मात्र त्याच्याशी चांगलेच का व कसे वागावे ? खरे बोलणे चांगले असते , हे खरे.पण खोटे बोलून फायदा होत असेल तर खरे बोलण्याचे कारण काय ? वाईट वागून लाभ होत असेल तर चांगले का वागायचे ? इ. प्रश्न आपल्याला थेट जगण्याशी संबंधित आहेत.ते आपल्या नैतिक जीवनाशी संबधित आहेत. अशा नैतिक प्रश्नांचा अभ्यास करणारी महत्वाची तत्त्वज्ञानाची शाखा म्हणजे ‘नीतिशास्त्र’ होय.

नीतिमत्ता हा केवळ माणसात आढळणारा गुणविशेष आहे.नीतिच्या आधारेच माणसाने समाज निर्मिती केली. साहित्य, संगीत, विविध कला, विज्ञान, धर्म, नाटय अशा गोष्टींनी सजलेली नटलेली, संस्कृती केवळ नैतिक जाणिवेमुळेच माणूस निर्माण करु शकतो. पण अशा भव्य दिव्य कृतीत युध्दाची , सत्तेची लालसा , अविश्वास , विविध प्रकारची हिंसा ही दुरिते सुध्दा आहेत.माणूस थोडयाश्या लाभासाठी दुर्वर्तनास तयार होतो म्हणूनच चांगल्या वाईटाचा प्रश्न निर्माण होतो.

चांगले म्हणजे काय ? हे कळत असूनही आपण वाईट का वागतो ? हा खूप मोठा नितीशास्त्रीय प्रश्न आहे. उदा. कुटुंबातल्या सुनेला , कुलवधूला ,स्वत:च्या भावजयीला भरलोकांमध्ये निर्वस्त्र करावे का ? हा द्रौपदीचा प्रश्न आणि आजच्या भ्रष्टाचाराचा प्रश्न नैतिकच आहे.अशा प्रश्नांची उत्तरे मिळतात. असे नाही पण त्याची चर्चा करणे मात्र आवश्यक असते. त्यातून काही किमान मार्गदर्शन मिळू शकते . अशा प्रश्नांचा व चांगले या संकल्पनेचा संयुक्त अभ्यास करणारी शाखा म्हणजे नीतिशास्त्र होय.

## (5)सौंदर्यशास्त्र (Aesthetics : Theories of Beauty )

नैतिक मूल्यांइतकी बंधनकारक नसलेली पण आपल्या जीवनाचा स्तर उंचावणारी मूल्ये म्हणजे सौंदर्यमूल्ये होय.आपल्या अनुभवाला येणारी विविध माणसे, माणसांच्या कृती, माणसांनी निर्माण केलेल्या वस्तू, निसर्गातील दृश्ये, घटना इत्यादी रमणीय वाटतात. काही वेळेस कुरूप, हिडीस वाटतात.आता ह्या वस्तू स्वत:च रमणीय असतात की त्या केवळ आपल्या भावना असतात ? सौंदर्य पाहणाऱ्याच्या नजरेत असते की त्या वस्तूत, घटनेत असते ? सुंदर म्हणजे काय ? सौदर्याचा अनुभव येतो म्हणजे नेमके कशाचा अनुभव येतो ? सुंदरतेचे निकष कोणते ? सुंदरता हा गुण सापेक्ष आहे की निरपेक्ष आहे ? जे सुंदर असते ते चांगले असते का ? सुंदरतेचा आणि कुरूपतेचा / असौंदर्याचा काय संबंध आहे ? अशा सौंदर्यविषयक प्रश्नांची चर्चा करणारे शास्त्र म्हणजे ‘*सौंदर्यशास्त्र*’ होय. साधारणत: सौंदर्य दोन प्रकारचे असते :

( अ ) निसर्ग सौंदर्य
( ब ) मानवनिर्मित कलेतील सौंदर्य

सौंदर्याच्या जाणिवेतूनच साहित्य संगीत,कला, नाटय,याची निर्मिती होते. कवितेचे वाचन, अन्नाचा रसास्वाद , मुलायम वस्त्राचा स्पर्श , आवडत्या व्यक्तींचे दर्शन इत्यादी सौदर्यविषय असतात किंवा वाटतात.माणूस ज्या कृती करतो ,त्यातील काही कलाकृती असतात.ताजमहाल, लेणी,चित्रकला, नाट्य इ.इ.इ. कलाकारापासून ते रसिक व समीक्षकापर्यंत कलात्मक व्यवहार कसा होतो, कलात्मक अनुभवाचे स्वरूप काय, कलेचे सौंदर्य कशात सामावलेले असते.कलेचे वर्गीकरण कोणत्या तत्त्वाच्या आधारे, कसे करता येईल, इत्यादी प्रश्नांच चर्चा सौंदर्यमीमांसेत केली जाते.

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



संक्षेपात,व्यक्ती व निसर्ग व्यक्ती व निसर्ग यांच्या सौंदर्याचा अनुभव येतो,त्यावेळी नेमके काय घडते ? या अनुभवाचे स्वरुप काय ? त्याचे निकष कोणते ? ते कसे निश्चित होतात ? सौंदर्यविषयक समस्या कोणत्या ? इत्यादी समस्यांची चर्चा करणारी तत्त्वज्ञानाची शाखा म्हणजे सौंदर्यमीमांसा होय .

## मूल्ये (Values):

माणूस जीवनात केवळ वस्तुस्थिती समजावून घेत नसतो, तर तिला आकार देतो. ती बदलतो. कारण माणूस केवळ ज्ञानशील नसतो तर तो कृतीशीलही असतो.तो ज्या कृती करतो त्यामागे त्याचा काहीएक मूल्यात्मक दृष्टिकोनही असतो.'काय आहे', यापेक्षा 'काय असावे, काय केले पाहिजे,कसे वागले पाहिजे' अशा प्रकारचा हा दृष्टिकोन असतो. या मूल्यांचा अभ्यास तत्त्वज्ञानात होतो.कोणती मूल्ये योग्य आहेत, कोणती अयोग्य आहेत, कोणता मूल्यात्मक दृष्टिकोन बरोबर आहे, कोणता चूक आहे यासारख्य प्रश्नांबरोबरच मूल्यात्मक विधानांचे नेमके स्वरूप काय, त्यांचे कार्य कसे चालते, वस्तुस्थिती सांगणाऱ्या विधानापेक्षा मूल्यविधाने वेगळी कशी असतात याची अभ्यास तत्त्वज्ञानात होतो.अशा मूल्यांचे वर्गीकरण ढोबळमानाने तीन प्रकारात करता येते.

( अ ) नैतिक मूल्ये ( Moral Values)

( बा ) सामाजिक व राजकीय मूल्ये (Social and Political Values)

( क ) सौंदर्यशास्त्रीय मूल्ये (Aesthetics)

यापैकी आपण नीतिशास्त्र आणि सौंदर्यशास्त्र यांचे स्वरूप पाहिलेच आहे. आता दुसऱ्या सामाजिक व राजकीय मूल्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल :

### सामाजिक व राजकीय मूल्ये: सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञान (Social and Political Philosophy)

नैतिक मूल्ये ही सर्व माणसांना माणूस म्हणून लागू होतात.पण माणूस हा विविध सामाजिक व राजकीय संस्थांशी संबंधित असतो. केवळ एखाद्या व्यक्तिचे नव्हे तर एकूण समाजाचे व सामाजिक संस्थांचे तसेच राज्यशासनाचे व्यवहार काही मूल्यांनी निश्चित केले जाते.ही मूल्ये नैतिक मूल्यांची सरमिसळ पावतात. पण काहीवेळा त्याहूनही वेगळे असतात.न्याय,सामाजिक वा राजकीय हक्क, कर्तव्ये,स्वातंत्र्य, बंधुता,समता तसेच सामाजिक करारातून निर्माण होणारे नियम व संकेत,रूढी,परंपरा ; त्याचप्रमाणे धर्मसंस्था, लोकशाही राज्यघटना या साऱ्या संकल्पनांना एक मूल्यात्मक आशय असतो.त्यांचा अभ्यास ज्या तत्त्वज्ञानाच्या शाखेत केला जातो ती शाखा म्हणजे *सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञान (Social and Political Philosophy)* होय.

## मूल्यशास्त्रे (Axiology)

वरील शाखापैंकी सौंदर्यशास्त्र व नीतिशास्त्र यांना **'तात्विक मूल्यशास्त्रे'** असे म्हणतात.ही शास्त्रे नीति व सौंदर्य या मूल्यांशी संबंधित आहे. मूल्य ही संकल्पना, किंमत या संकल्पनेच्या विरोधी आहे. 'किंमत' (cost / price) ही अर्थशास्त्रीय संकल्पना आहे तर **'मूल्य' (Value)** ही तत्वज्ञानात्मक संकल्पना आहे.जे निर्माण करता येते, ज्याची खरेदी विक्री करता येते, जे बाजारात उपलब्ध आहे त्या सगळयांना किंमत असते. मूल्य मात्र बाजारी वस्तू नसते. व्यक्तीने व समाजाने प्राप्त करावयाची , जीवनात साधावयाची बाब आहे.ज्यासाठी जगावयाचे असते, जे मिळवावयाचे असते ते मूल्य होय.उदा.प्रेम,मैत्री,करुणा,समता,न्याय, बंधुता, सौंदर्य, चांगुलपणा या सर्वांना किंवा अशा इतर गोष्टींना मूल्य असते.नीति व सौंदर्य ही अशीच **'तात्त्विक मूल्ये' (Philosophical Values** ) आहेत. त्यामुळेच त्यांच्या अभ्यास करणाऱ्या शास्त्रांना 'मूल्यमीमांसा' म्हणतात.

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052



मूल्य या संकल्पनेचे स्वरूप लक्षात घेता आणि सामाजिक व राजकीय मूल्ये गृहीत धरता; तत्त्वज्ञानाच्या एकूण सहा शाखा तयार होतात. त्या अशा :

## तत्त्वज्ञानाच्या पाच शाखा

1. तर्क शास्त्र (Logic)
2. सत्ता शास्त्र ( Metaphysics )
3. ज्ञान शास्त्र ( Epistemology )
4. नीति शास्त्र ( Ethics )
5. सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञान ( Social and Political Philosophy )
6. सौंदर्य शास्त्र (Aesthetics: Theoris of Beauty )

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

अर्थात आपण सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञान अथवा मूल्ये वगळून तत्त्वज्ञानाच्या मुख्य पाच शाखांवरच लक्ष केंद्रीत करणार आहोत. वरील सर्व शब्दांमधील मीमांसा म्हणजे चिकित्सा, परीक्षण होय.त्याच अर्थाने 'शास्त्र ' हा शब्दही वापरला जातो.पण येथे 'शास्त्र' हा शब्द विज्ञान (Science) या अर्थाने वापरलेला नाही.तर 'चिकित्सा करणारी ज्ञानशाखा' या अर्थाने उपयोगात आणला आहे.त्यानुसार तर्कशास्त्र,ज्ञानशास्त्र इत्यादी शब्द वापरले जातात.

## 1.3 : तत्त्वज्ञानाचे मूल्य : तत्त्वज्ञानाचे उपयोग, फायदे आणि मूल्य

(अ) तत्त्वज्ञानाचे उपयोग व फायदे [12] :

तत्त्वज्ञानाचा जीवनात काहीएक थेट उपयोग होवू शकतो का ? असा प्रश्न यथार्थपणे उपस्थित करता येईल. या विषयाचा अभ्यास करावयाचा कशासाठी ? काही अडलयं काय ? उदाहरणार्थ चहा पिणे,नाटक पहाणे,पुस्तक वाचणे, सत्ता,संपत्ती मिळविणे या भौतिक गोष्टीचा उपयोग एक प्रकारचा आनंद मिळविणे आहे.येथे आनंद हा हेतू असतो तर या साऱ्या कृती त्या हेतूचे साधन असतात. तसे तत्त्वज्ञानाचा हेतू काय ? तात्त्विक कृती केली,तत्त्वचिंतन केले की कशाचा लाभ होतो ? कोणता आनंद मिळतो ? तर या प्रश्नांचे उत्तरे अशी:

(1) तत्त्वज्ञानाची अटळता

तत्त्वज्ञान हा जीवनविषयक दृष्टीकोन आहे. प्रत्येक व्यक्ति जगताना कोणता ना कोणता दृष्टीकोन स्वीकारल्याशिवाय जगू शकत नाही.आशावाद,निराशावाद,तुच्छतावाद,ईश्वरवाद,निरीश्वरवाद,इहवाद किंवा परिस्थितीला शरण जावून विनाप्रश्न जगणे अथवा सतत आव्हाने देत राहून संघर्ष करणे असे कोणतेही जीवन आपण एखादा दृष्टीकोन स्वीकारल्याशिवाय जगूच शकत नाही.प्रत्येकाचे जगण्याचे, जीवनाचे एक स्वतंत्र तत्त्वज्ञान असते,असे त्यासाठीच म्हंटले जाते.हे जग,जगातील माणसे,ईश्वरासह सर्व वस्तूविषयी काहीतरी चांगलेवाईट, योग्यअयोग्य मत बनविल्याशिवाय जगणे अशक्यच असते. ते मत बनविणे हेच तत्त्वज्ञान असते. ते टाळता येत नाही. तत्त्वज्ञान अटळ असते.

---

[12] ए.सी. ईविंग - *दि फन्डामेंटल क्वेश्चन्स ऑफ फिलॉसॉफी* पान 10 ते 15, आरकेपी 1954.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

मग जे अटळ आहे,त्याचा सकारात्मक स्वीकार करुन त्याचे सुव्यवस्थित आकलन करवून घेतले तर लाभलेले विद्यमान जीवन अधिक चांगले जगता येते.शेवटी *'जीवनात अधिक सहयोग कसा साधावा ?'* हाच तर आपला हेतू असतो.अशा वेळी जे अटळ आहे, ते नीटपणे स्वीकारणे हा योग्य समंजसपणा ठरतो.



(2) संदर्भाची व्यापकता

तत्त्वज्ञानाचा परिचय झाला तर व्यक्तिच्या विचारांचे सर्व संदर्भ व्यापक होतात. स्वत:च्या दु:खाकडे या जगाच्या तुलनेत कसे पाहावयाचे, हे ती शिकते.सामान्य माणूस सुखदु:खाने आनंदी/ व्याकुळ होतो. केवळ स्वत:च्याच सुखदु:खात बुडून जातो.पण तत्त्वज्ञानाच्या अध्ययनाने स्वत:च्या सुखदु:काकडे व्यक्ति तटस्थपणे पाहू शकते.गौतम बुध्द, भगवान महावीर यांना तर कोणत्याही सुखाची कमतरता नव्हती पण त्यांना जगातील दु:खाची जाणीव झाली.कारण त्यांच्यात तात्विक वृत्ती होती.त्यांच्या तात्विकतेमुळे त्यांचा जीवनाचा संदर्भ मोठा झाला. ते इतरांचा विचार करु शकले.

(3) बौध्दिक शिस्त

तत्त्वज्ञानातील युक्तिवाद अगदी काटेकोर असतात.तिथे बेशिस्त चालत नाही.तत्त्वज्ञानाच्या अध्ययनाने व्यक्तिच्या विचारांमध्ये शिस्त येते. विचारांमध्ये नि:संदिग्धता आणि सुस्पष्टता येते. ती आचारात उतरते.ही शिस्त जीवनाच्या सर्व क्षेत्रात उपयोगी पडते.व्यक्तीला तार्किक विचार करण्याची सवय लागते.मग व्यक्ति योग्य निष्कर्षाकडे येवून योग्य कृती करण्याचा निर्णय ती घेते. थोडक्यात *आचार, विचार आणि अनुभव* या तीनही अंगाने व्यक्ती समृध्द होते.त्यायोगे समाजही योग्य दिशेने प्रगती करू शकतो.

(4) सत्याचा शोध :

चहा पिणे इत्यादी भौतिक गोष्टीतून जसा आपणास आनंद मिळतो तसा सत्याचा शोध करण्यातूनही आनंद मिळतो.सत्य, मग तो कोणत्याही प्रकारचे असो, प्राप्त झाले की सत्यशोधकाला आनंद मिळतो. दैनंदिन जीवनात प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या सत्यशोधनात गुंतलेला असतो.सामान्य माणूस विद्यार्थि, पत्रकार, संशोधक,वैज्ञानिक इत्याही मंडळी त्यांच्या त्यांच्या क्षेत्रातील सत्य शोधतातच. पण हातगाडीवाला,शेतमजूर,नोकर अथवा कुणीही सामान्य माणूसही जगताना त्याचे त्याचे सत्य शोधत असतोच.त्यातून कदाचित व्यक्तिगत सत्य अथवा सामाजिक सत्य असाही प्रकार येवू शकतो.

काही सत्ये तात्पुरती तर काही अंतिम स्वरुपाची असतात. एखादे सत्य सापडले की हेतू संपतो.मग नव्या सत्याचा शोध सुरु होतो.पण अंतिम सत्य असे असते की जे सापडण्यासाठी दीर्घकाळ लागू शकतो.किंवा मग सत्यविषयक तुमची संकल्पना काय आहे, या प्रश्नाच्या उत्तरावर शोधाचा काल अवलंबूनअसतो. किंवा मग ' सत्य म्हणजे काय ? ' हाच एक शोधप्रकल्प ठरतो.तो मोठा आनंद देणारा असतो. सत्यशोधन करणे ही तात्त्विक वृत्ती (Philosophical attitude ) आहे. केवळ तत्त्वज्ञच तिला चांगली दिशा देतो.सॉक्रेटीस तर सत्यशोधनाला तत्त्वचिंतन समजतो.

(5) समाजजीवनावर अप्रत्यक्ष प्रभाव:

सत्यशोधन करण्याच्या प्रक्रियेतून आणखी एक बाब लक्षात येते .ती म्हणजे जे काही सत्य सापडते त्याचा प्रभाव व्यक्तिजीवनावर आणि समाजजीवनावर होतो.कधी तो थेटपणे पडतो तर बहुतेक वेळा अप्रत्यक्षपणे पडतो. त्या त्या समाजात जे काही साहित्य,संगीत,कला,इत्यादी असतात;त्यांची रचनाच मुळात त्या समाजाच्या जीवनविषयक दृष्टिकोनावर अथवा तत्त्वज्ञानावर अवलंबून असते.त्या समाजातील प्रचलित कथा,प्रवचने,संगीत,कला, पुराणकथा, धार्मिक कथा,लोककला,परंपरा इत्यादीमार्फत आणि अलिकडील कालात वृत्तपत्रे,वाहिन्या, इंटरनेट,मोबाईल इत्यादी माध्यमांमार्फत जास्तच प्रभावीपणे ते तत्त्वज्ञान समाजजीवनात पसरते. या साऱ्या गोष्टी प्रत्येक व्यक्तीचा जीवनाकडे आणि जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन तयार करतात.


DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

उदाहरणार्थ अमेरिकन जीवनाचे जगाला आकर्षण आहे.तेथील सर्व प्रकारची समृध्दी मनाला मोह घालते.अमेरिकन राज्यघटना विशेषत: जॉन लॉक (1632 ते 1704) या अनुभवादी तत्त्वज्ञाच्या तत्त्वज्ञानावर रचली गेली आहे.'केवळ पाचशे वर्षाचे वय असलेल्या अमेरिकेतील ख्रिश्चन धर्मावर दोन हजार वर्षांच्या ख्रिश्चन तत्त्वज्ञानाचा प्रभाव आहे,' हे लक्षात घेतले पाहिजे.'आपण सर्व एकाच ईश्वराची लेकरे आहोत ' हे करुणामय ख्रिश्चन तत्त्वज्ञानच ख्रिश्चन धर्माचा मूलभूत आधार आहे.त्यामुळेच कोणत्याही माणसाला साधनवस्तू मानू नये,असे अमेरिकन राज्यघटना सांगते.विज्ञान अनुभवावर आणि प्रयोगावर अवलंबून असते, या आधारावरच आज एक प्रगत वैज्ञानिक राष्ट्र म्हणून अमेरिका पुढे आली.भौतिकदृष्ट्या श्रीमंत झाली.आज अमेरिका जगात ज्ञान,पैसा,तंत्रज्ञान,विज्ञान या सर्वबाबतीत महासत्ता बनली आहे.कारण तिचे तत्त्वज्ञान अनुभववादी व विज्ञानवादी आहे.




**John Locke**
( 29 August 1632 – 28 October 1704)
The *Father of Liberalism*,
an English philosopher and physician.
One of the most influential of Enlightenment thinkers



स्वातंत्र्य,समता,बंधुता या समानतेच्या सामाजिक मूल्यांबरोबरच भौतिक समृध्दि हे मूल्य देणाऱ्या फ्रेंच राज्यक्रांतीमागे जॉ झ्यॅक रुसो (1712 ते 1778) या तत्त्वज्ञाच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता.स्वातंत्र्य,समता,बंधुता या तत्त्वत्रयीचा प्रभाव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवरही होता.आणि त्याचे प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेत उमटलेले दिसते. कायदा,राजकीय तत्त्वज्ञान,राज्यशास्त्र,अर्थशास्त्र यांचा उदय प्राचीन ग्रीक विचारांमध्ये आढळतोच, पण बेकन,हॉब्ज,मिल्ल यांच्या तत्त्वविचारांमधून तो विकसितही झाला आहे.ग्रीकांचे खगोलशास्त्र हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचाच भाग होता. त्यामधूनच भौतिकशास्त्र आणि गणित विकसित झाले.अशा रितीने पाश्चात्य देशांमधील भौतिक व सामाजिक शास्त्रांच्या उदयाला व एकूण वैज्ञानिक संस्कृतीच्या विकासाला आधारभूत तेथील तत्त्वज्ञानच होते.

**Jean-Jacques Rousseau**
(28 June 1712 – 2 July 1778)
a major Genevan philosopher, writer, and composer of 18th-centuryRomanticism.
His political philosophy heavily influenced the French Revolution



DEPARTMENT OF PHILOSOPHY ... COLLEGE

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

दुसरे महत्वाचे उदाहरण आपलेच घेता येईल.भारतीय समाजजीवनावर हिंदू तत्त्वज्ञानाचा प्रभाव आहे. वेद,उपनिषदे, मनुस्मृति, धर्मशास्त्र तसेच पुराणकथा, संतसाहित्य यातून प्रतिबिंबीत झालेल्या तत्त्वज्ञानाचाच भारतीय समाजमनावर जबरदस्त प्रभाव आहे. या तत्त्वज्ञानात सर्वांना आध्यात्मिक दृष्टिकोनातून समान लेखण्याचा विचार आहे खरा, पण त्याचवेळेस माणसामाणसांमध्ये उच्चनीचता बाळगण्याचा वर्णजातिव्यवस्थेचा, रोटीबेटीबंदीचा, अस्पृश्यतेचाही विचार आहे. प्रवृत्तिवादी कर्मकांडाचा आणि कर्मयोगा विचार आहे.तसाच निवृत्तिपर संन्यासाचा, द्वैतवादाचाही विचार आहे.

आज आपल्या समाजात दिसणाऱ्या अनेक दुष्ट रूढींना , अंधश्रध्दांना, समाजजीवनातील विसंगतीना, तसेच अनेक बदल पचवून पुनहा स्थिर राहण्याच्या प्रवृत्तीला हे परंपरागत तत्त्वज्ञान कारणीभूत आहे, असे म्हणता येईल.त्यामुळे भारतीय समाज असा का आहे ? हे समजावून घ्यावयाचे असेल तर भारतीय तत्त्वज्ञान समजून घेतले पाहिजे. आणि भअरतीय समाज बदलावयाचा असेल तर त्याला नव्या तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान असले पाहिजे.

अशा रितीने समाजजीवन समजून घेण्यासाठी तसेच समाजीवनात परिवर्तन करण्यासाठी तत्त्वज्ञानाचा अभ्यास आवश्यक आहे.

## (6) संस्कृतीच्या चारित्र्याचा आधार :

वरील उपयोग लक्षात घेतले तर आणखी एक महत्वाचा उपयोग समोर येतो. तो म्हणजे तत्त्वज्ञान हे त्या त्या देशाच्या संस्कृतीच्या आणि राष्ट्रीय चारित्र्याचा आधार असते.त्यामुळेच एखाद्या राष्ट्राचे जीवन व संस्कृती समजावून घ्यावयाचे तर त्या राष्ट्राचे तत्त्वज्ञान समजावून घेतले पाहिजे,असे विश्वविख्यत तत्त्वज्ञ बर्ट्रांड रसेल (1872 ते 1970) यांचे मत आहे.

अन्य एक श्रेष्ठ तत्त्वज्ञ ए.एन.व्हाईटहेड (1861ते1947) यांच्या मते 'तत्त्वज्ञान व्यक्तिला आणि समाजाला अंर्तदृष्टि आणि दूरदृष्टी देते.जीवन का जगावे ? संस्कृती का टिकवावी ? याचे मार्गदर्शन करते.व्यक्तिचे आणि राष्ट्राचे चारित्र्य ज्यावर अवलंबून आहे अशा मूलभूत श्रध्दांकडे माणसाने वळावे आणि त्यांची काटेकोर चिकित्सा करावी,त्यांचे विश्लेषण करावे' हे तत्त्वज्ञानाचे काम आहे.

**Alfred North Whitehead**
(15 February 1861 – 30 December 1947)
English mathematician who became a philosopher. He wrote on algebra, logic, foundations of mathematics, philosophy of science, physics, metaphysics, and education



जगाविषयीचे आणि जीवनाविषयीचे सर्वसाधारण दृष्टिकोन हेच त्या संस्कृतीचे मूलाधार असतात.हा दृष्टिकोन देण्याचे काम मुख्यत: धर्मसंस्था आणि धार्मिक संस्था करतात.पण धर्म आणि संस्थाच मुळात त्या समाजातील तत्त्वज्ञानावर अवलंबून असतात.तेच राष्ट्राचे चारित्र्य घडविते.

## (7) धर्म व विज्ञानापलिकडील समस्या:


DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052



विज्ञान,धर्म आणि तत्त्वज्ञान यांचा संबंध जवळचा आहे. धर्म आणि तत्त्वज्ञान यांचा प्रवास एकत्र सुरु झाला.त्याचवेळी तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांची बीजेही एकत्र रुजली गेली.ज्ञानाच्या विकासाच्या प्रवासात धर्माचा तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांच्याविरुध्द संघर्ष होत गेला. धर्माचा प्रभाव पडत राहिला पण विज्ञान जिंकत गेले,तत्त्वज्ञान सजग पण तटस्थ रााहिले. धर्माचा भर मुख्यत: भयावर असतो आणि या भयातून सुटण्यासाठी धर्म व धर्मसंस्था श्रध्देचा आधार घेतात. तर विज्ञान व तत्त्वज्ञानाचा आधार कुतुहल आणि तर्कनिष्ठ ज्ञानाच्या व सम्यक् विचाराच्या सहायाने भयमुक्ती मिळविणे हे असते.

धर्माचा आधार श्रध्दा व गुढानूभूती हा असतो तर विज्ञानाचा आधार रोकडा अनुभव व तर्कबुध्दि हाच असतो.मानवी जीवनात दोघांचाही गरज असते. पण त्यातूनच काही तात्त्विक समस्या निर्माण होतात.श्रध्दा व बुध्दि यांची सीमारेषा ठरविणे, आवश्यक ठरते.त्यांचा समन्वय करण्याचेच काम तत्त्वज्ञान करते.

धर्म व विज्ञान यात अंर्तभूत असलेल्या संकल्पना स्पष्ट करणे व त्यांचा चिकित्सा करणे हे ही तत्त्वज्ञानानेच शक्य होते.उदाहरणार्थ एखादा धर्म ईश्वराचे अस्तित्व मानतो दुसरा मानत नाही.ईश्वर असो वा नसो पण ईश्वर या संकल्पनेचे स्वरुप स्पष्ट करणे , तसेच ईश्वरविषयक युक्तिवादांचे स्वरूप स्पष्ट करणे, हे मात्र तत्त्वज्ञानाचे काम असते. धर्माचा समाजजीवनावर बरावाईट परिणाम होत असतो.उदाहरणार्थ बहुधा ईश्वर पुरुषी असतो.तेथूनच स्त्रियांच्या गुलामगिरीला प्रारंभ होतो.स्त्रियांच्या गौण स्थानाचे समर्थन सुरु होते.धार्मिक श्रध्देच्या प्रभावातून समाजात घसरणाऱ्या अनीती व अन्यायावर प्रकाश टाकण्याचे कार्यही तत्त्वज्ञानाद्वारे करता येते.

विज्ञान सर्व काही प्रयोग करु शकते पण त्याला मर्यादा असतात.उदाहरणार्थ ते विश्वनिर्मितीचा प्रयोग करू शकत नाहीत अथवा मानवाच्या आत्म्यावर प्रयोग करू शकत नाही.या विश्वामागे काही हेतू आहे का ? या प्रश्नाचा विज्ञान शोध घेवू शकत नाही. विज्ञानाच्या सीमारेषेवर असलेल्या या प्रश्नांची चर्चा करण्यासाठी आधार तत्त्वज्ञानाचाच घ्यावा लागतो.

## (8) संकल्पनांचे विश्लेषण :सुईणीचे काम

याचा अर्थ असा की माणसाने मिळविलेल्या ज्ञानाची व जीवनाची चिकित्सा करणे आवश्यक आहे.ज्या जीवनाची चिकित्सा केली जात नाही,ते जीवन जगण्यासाठी लायक नसते, असे सॉक्रेटीसचे मत आहे.ही चिकित्सा कशी करावी हे समजून घेण्यासाठी तत्त्वज्ञानाचा उपयोग होतो.

चिकित्सा करण्याची तत्त्वज्ञानाची प्राचीन पध्दती आहेच, पण विसाव्या शतकात चिकित्सेला आणखी सुव्यस्थित स्वरूप लाभले आणि तत्त्वज्ञान म्हणजे संकल्पनांचे विश्लेषण करणे,ही नवी संकल्पना रूजली.या आधुनिक संकल्पनेनुसार द्रव्य,सगुण,कारण,सत्य-असत्य,चांगले-वाईट, योग्य-अयोग्य,अणु-परमाणु इत्यादी संकल्पनांचे विश्लेषण करणे हे तत्त्वज्ञानाचे काम आहे.

सामाजिक व राजकीय क्षेत्रात राष्ट्रीय एकात्मता, इहवाद, स्त्रीमुक्ति, स्त्रीस्वातंत्र्य,न्याय,समता अशा अनेक संकल्पना सामान्य जीवनात बेधडकपणे वापरल्या जातात.पण त्यांचे नेमके अर्थ संदिग्ध राहतात.मग वैचारिक गोंधळ वाढतो. तोच व्यवहारात उतरतो. अलिकडील अशा काही वादग्रस्त संकल्पना म्हणजे हिंदुत्व,नवहिंदुत्व,हिंदुराष्ट्रवाद, अल्पसंख्याकवाद, दहशतवाद,निधर्मीवाद,समान नागरी कायदा, राष्ट्रप्रेम इत्यादी.या दोन्ही प्रकारातील जीवनात ही तात्त्विक चिकित्सा अतिशय आवश्यक असते.बहुधा राजकीय पक्ष लोकांना भावनिकदृष्ट्या आवाहन करुनच सत्तेवर येत असतात.पण जनतेने चांगले आणि वाईट यात फरक करावयास शिकणे, यात लोकशाहीचे यश असते.नेमके तेच राज्यकर्त्यांना नको असते.पण चांगले आदर्श राज्य निर्माण होण्यासाठी संकल्पनांची चिकित्सा आवश्यक असते. चिकित्सक तत्त्वज्ञान योग्य व चांगला विचार करण्याचे आणि वैचारिक सुसंगती कशी राखावी; त्याचवेळी कसलाही गोधळ कसा टाळावा, याचे प्रशिक्षण जनतेला देते.

बहुतेक वेळा संकल्पनांचे अर्थ व्यक्तीच्या मनात असतात.पण त्या व्यक्त कराव्या कशा ते तिला समजत नसते.तेच तत्त्वज्ञाचे काम असते.त्या अर्थाचे विश्लेषण करून बाहेर काढणे,त्याला आकार देणे हे त्या कामाचे स्वरुप असते. व्यक्तिच्या मनात अथवा समाजमनात ज्या कल्पना अथवा संकल्पना असतात त्यांना व्यक्त करण्यासाठी, त्यांना मूर्त वास्तव स्वरुप देण्यासाठी जी मदत लागेल तेवढीच मदत तत्त्वज्ञ करीत असतो.म्हणूनच सॉक्रेटीस म्हणतो ''तत्त्वज्ञ फक्त सुईणीचे काम

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



करतो.'' सुईण मूल निर्माण करीत नाही.ते आईच्या उदरात असतेच.त्याचा या जगातातील  प्रवेश सोपा करण्याचे आणि आईला मातृत्वाचा लाभ करुन देण्याचे काम सुईण करीत असते,एवढेच.

## भाषेचेच विश्लेषण : तात्त्विक विश्लेषण


संकल्पनांचे विश्लेषण हे भाषेचेच विश्लेषण असे.भाषेचे व्याकरणिक रूप अनेकदा फसवे असते.ते उघडे करणे व त्याचा अर्थ सुस्पष्ट करणे हे तत्त्वज्ञाचे काम होय. उदाहरणार्थ '' चैतन्य हे आत्म्याचे स्वरूप आहे '' आणि '' अग्नी हे धुराचे कारण आहे '' तसेच '' लोकशाहीत प्रत्येक नागरिक स्वतंत्र असतो '' आणि '' कुटुंबात प्रत्येक स्त्री स्वतंत्र असते '' ही विधाने व्याकरणाच्या दृष्टिने समान वाटली तरी त्यात अंर्तभूत असलेले संकल्पनांचे संबंध वेगळे आहेत. याचाच अर्थ त्या प्रत्येक विधानाचे तार्किक व्याकरण वेगवेगळे आहे.हा संकल्पना भेद स्पष्ट करणे म्हणजे तात्त्विक विश्लेषण करणे होय.हा तात्त्विक विश्लेषणाचा दृष्टीकोन  आहे.

हा तात्त्विक दृष्टीकोन लोकांमध्ये रूजणे महत्वाचे आहे. " *सर्वसाधारण शिक्षणव्यवस्था जनतेमध्ये तात्त्विक दृष्टिकोन निर्माण करीत नाही तोपर्यंत लोकशाही समाजाला यश मिळू शकत नाही ''*असे व्हाईटहेडचे मत आहे.

कित्येकदा आपल्या समोरची समस्या कळत नाही.कळाली तरी तिच्या विश्लेषणासाठीचे प्रशिक्षण नसते.तेव्हा प्रश्न विचारुन समस्येची जाणीव करुन देणे व ती समस्या दूर करण्यासाठी योग्य त्या संकल्पना आणि संकल्पनाभेद सुचविणे हे काम तत्त्वज्ञान करते.विश्लेषणासाठी आवश्यक ती वैचारिक हत्यारे निर्माण करण्याचे महत्वाचे व मूलभूत काम तत्त्वज्ञान करते.

## (क) तत्त्वज्ञानाचे मूल्य : रसेलचे मत

जगप्रसिध्द तत्त्वज्ञ बर्ट्रांड रसेल (1872-1970) च्या मते 'तत्त्वज्ञान' हा शब्द अनेकार्थी उपयोगात आणला गेला आहे.काही व्यापक तर काही संकुचित अर्थाने त्या शब्दाचे उपयोजन झाले आहे.



**विज्ञान आणि ईश्वरशास्त्र**

रसेलच्या मते, तत्त्वज्ञान हा शब्द ईश्वरशास्त्र आणि विज्ञान यांच्या 'मध्ये' कुठेतरी येतो. त्यासाठी तो विज्ञान आणि ईश्वरशास्त्र यात फरक करतो. जगातील सर्व प्रश्नांवर निश्चित उत्तर देते ते विज्ञान आणि जिच्यात केवळ आग्रही मते असतात, कुठलेही निश्चित ज्ञान नसते पण लोक ज्यावर विश्वास ठेवू इच्छितात तो प्रांत म्हणजे ईश्वरशास्त्र होय. या दोन्ही ईश्वरशास्त्र आणि विज्ञान यांच्यामध्ये '***एक निर्जन प्रदेश'(No Man's Land)*** आहे की ज्यावर सतत वरील दोन्ही बाजूंनी सततच हल्ले होत राहात. हा प्रदेश म्हणजे तत्त्वज्ञान होय, असे रसेलचे मत आहे.[13]

1. *मनाचे अन्न*

**तत्त्वज्ञानाविषयी गैरसमज**

[13]"पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास : रसेलकृत परिचय'' : अनुवाद - श्रीनिवास हेमाडे *परामर्श* खंड 19 अंक 3, नोव्हेंबर 1997. विभागाच्या वेबसाईटवर लेख उपलब्ध आहे, तो वाचावा.



DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



रसेलच्या मते, तत्त्वज्ञानाविषयी अनेकांच्या मनात अनेक गैरसमज असतात. हे गैरसमज मुख्यत: आपल्या जगण्याविषयीच्या चुकीच्या कल्पनामुळे निर्माण होतात.त्यात विज्ञानाचा वाढता प्रभाव, त्यात कवळ पैशाला-व्यवहाराला व त्यातून निव्वळ व्यावहारिकतेला आलेले महत्व यांची भर पडते. तसेच 'व्यवहार' या संकल्पनेचीच चुकीची कल्पना आणि व परंपरेला, रूढी-संकेतांना चिकटून राहण्याची प्रवृत्तीही कारणीभूत होते. मग अशा गोष्टींची चर्चा निरर्थक वाटते. मग अशा निरर्थक गोष्टींची चर्चा म्हणजे तत्त्वज्ञान, हा गैरसमज पसरो. पण ते चुकीचे आहे, असे रसेल दाखवून देतो.

जगणे म्हणजे फक्त शरीरासाठी जगणे, हे मर्यादित उद्दिष्ट ठेवल्याने जीवनविषयक तत्त्वज्ञानही तसेच शरीराच्या पातळीवरच राहते. माणूस म्हणजे केवळ शरीर, अशी माणसाची व्याख्या करणे, चुकीचे आहे. माणसाला मन असते, त्या मनाच्याही गरजा असतात. प्राण्यांना मन नसते, माणूस प्राणी नाही. हा मुख्य फरक आहे. म्हणून माणसांच्या मनाचा विचार आवश्यक ठरतो. वर्ण-जाती-लिंगभेद, आर्थिक, सामाजिक, राजकीय विषमता या माणसाच्या मनाचा विचार न करता निर्माण केलेल्या शोषणाच्या, गुलामगिरीच्या व्यवस्था आहेत. त्या विरोधात विचारी संवेदनशीलता दर्शाविणे ही तात्त्विक प्रवृत्ती आहे, असे रसेलला म्हणावयाचे आहे. त्याच्या मते, रूढी-परंपरेच्या जोखडातून केवळ तत्त्वचिंतनच माणसाला मुक्ती देते.

### व्यवहारी माणूस कोण ?

तत्त्वज्ञानाचे मूल्य नेमके कशात आहे ? प्रत्येकाने तत्त्वज्ञानाचा अभ्यास का करावा ? याचे समर्पक उत्तर बर्ट्रांड रसेल त्यांच्या '*तत्त्वज्ञानातील समस्या*'[14] या पुस्तकात देतात. ते म्हणतात, ''ज्ञानाचे मूल्य निश्चित करण्यासाठी आधी एक गोष्ट निश्चित करावी लागते.ती म्हणजे ज्यांना आपण 'व्यवहारी माणसे' असे म्हणतो ती माणसे बाळगीत असलेल्या काही पूर्वग्रहांपासून आपण आपली सुटका करुन घेतली पाहिजे.व्यवहारी माणूस कोण ? तर *ज्याला केवळ माणसाच्या शरिरांनाच अन्नाची गरज आहे हे ओळखता येते पण मनालाही अन्नाची गरज आहे, याचा ज्याला विसर पडतो तो माणूस म्हणजे व्यवहारी माणूस.''*

म्हणजे असे की, आता,समजा या व्यवहारी माणसाच्या म्हणण्यानुसार शरीराच्या सगळ्या गरजा भागल्या,सगळी माणसे सुखवस्तू झाली, दारिद्र्य,रोगराईचे शक्य तितके उच्चाटन करण्यात आले. मग समाज सुखी होईल काय? शक्यता कमीच असते. दु:ख नाहीसे झाले तरी मूल्यवान समाज निर्माण होईल,असे नाही.

उलट मूल्यवान समाज निर्माण करण्यासाठी आणखीही बरेच काही करावे लागते.जे काही करावे लागते ते माणसाच्या मनाच्या दृष्टिने महत्वाच्या असते.तेच तर मनाचे अन्न असते.तत्त्वज्ञानाचे मूल्य अशा मनाच्या दृष्टिने श्रेयस्कर असलेल्या गोष्टीत असते. साहित्य, संगीत,गणित, तत्त्वज्ञान यासारख्या गोष्टीत हे अन्न दडलेले असते. तत्त्वज्ञान किंवा तत्त्वचिंतनाचे,तत्त्वज्ञानाचे मूल्य असते'', असे रसेल म्हणतो.

### भतृहरीचे मत

भारतीय महाकवि भतृहरीच्या[15] मते, तर साहित्य, संगीत, कला यात रस नसणारा, अभिरूचि न घेणारा माणूस म्हणजे शेपूट आणि शिंगे नसलेले जनावर असते. ते गवत सुध्दा न खाता जगू शकते. त्याचे असे जगणे हे इतर प्राण्यांचे नशीबच समजावे.''

*साहित्य संगीत कला विहीन: साक्षात पशु: पुछ विषाण हीन: ।*
*तृणं न खादनपि जीवमान: तद् भागधेयं परम पषूणां ।।*

---

[14] बर्ट्रांड रसेल *तत्त्वज्ञानातील समस्या* भाषांतर मे.पु.रेगे महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई 1978.
**गृहपाठ :** रसेलचा हा लेख मुळातून वाचणे आवश्यक आहे. वाचण्यासाठी तत्त्वज्ञान विभागाच्या वेबसाईटवर जावून 'तत्त्वज्ञानाचे मूल्य' ही जोडणी पाहावी.

[15] भर्तृहरी (मराठी नामभेद: भर्तृहरी, भर्तरी, भर्तरीनाथ) (जीवनकाळ: अंदाजे इ.स.चे ५ वे शतक) हा उज्जयिनीचा राजा विक्रमादित्य याचा थोरला सावत्र भाऊ होता. *नीतिशतक*, *शृङ्गारशतक* व *वैराग्यशतक* या नावाने ओळखल्या जाणाऱ्या *शतकत्रय* या संस्कृत भाषेतील ग्रंथसंग्रहाचा रचनाकार म्हणून हा प्रसिद्ध आहे. याला *पिंगला* नामक पत्नी होती. नाथपंथीय आख्यायिकांनुसार गृहस्थाश्रम त्यजून याने संन्यासाश्रम स्वीकारला, अशी समजूत आहे. नाथपंथीय सिद्धांच्या नामावलीतील *भर्तरीनाथ* म्हणजे हाच असल्याची सांप्रदायिक मान्यता आहे. http://mr.wikipedia.org/wiki/**भर्तृहरि**

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

## 2. सृजनशील अनिश्चितता

रसेलच्या मते, इतर अनेक विद्याशाखांप्रमाणे तत्त्वज्ञानाचे उद्दिष्टही ज्ञानसंपादन हेच आहे. तत्त्वज्ञान सर्वसमावेशक व्यापक ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करते. तत्त्वज्ञान ज्या प्रकारचे ज्ञान देण्याचा प्रयत्न करते त्यातून विज्ञानाच्या शाखांमध्ये एकात्मता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो, त्याचप्रमाणे आपल्या विविध धारणा, पूर्वग्रह, व विश्वास यांचे चिकित्सक परीक्षण केले जाते.अर्थात विज्ञानात जशी निश्चितता असते तशी तत्त्वज्ञानात नसते. पण रसेलच्या मते, निश्चितता नसणे, हे ही तत्त्वज्ञानाची मर्यादा नाही, तर तेच त्याचे मूल्य आहे. कारण, तत्त्वज्ञानातील अनिश्चितता ही देखील सृजनशील असते.



**विज्ञान आणि तत्त्वज्ञान**

येथे रसले विज्ञान आणि तत्त्वज्ञान यातील फरक स्पष्ट करतो. रसेलच्या मते, तत्त्वज्ञानाने प्रश्न विचारला व उत्तरे शोधण्याचा प्रयत्न सुरु केला की काहीतरी उत्तर सापडते. असे उत्तर मिळून कोणत्याही ज्ञानाच्या एखाद्या सिध्दान्ताला, प्रणालीली निश्चितता आली की ती प्रणाली तत्त्वज्ञानापासून अलग होते, ते तत्त्वज्ञान राहात नाही, तर विज्ञान म्हणून प्रस्थापित होते. उदाहरणार्थ विश्वाचे कारण काय? हे विश्व म्हणजे काय? हे प्रश्न ग्रीक तत्त्वज्ञानात हजारो वर्षापूर्वी विचारले गेले. त्यांचे स्वरूप तात्त्विक आहे, पण उत्तरे शोधली गेली आणि त्यातून खगोलशास्त्र अस्तित्वात आले. वेगळ्या भाषेत खगोलशास्त्राचा पूर्वी तत्त्वज्ञानातच समावेश होत होता, म्हणूनच प्रसिध्द शास्त्रज्ञ आयझॅक न्यूटनने त्याच्या महान ग्रंथाला ''निसर्ग तत्त्वज्ञानाची गणिती तत्त्वे'' असे नाव दिले होते. आता विसाव्या शतकात खगोलशास्त्राच स्वतंत्र विज्ञान म्हणून अभ्यासले जाते. तीच बाब मनाची आहे. मनाचा अभ्यास पूर्वी तत्त्वज्ञानात होत असे, आता त्याचेच मानसशास्त्र तयार झाले आहे.

## 3. कुतूहल जागृत ठेवणारी अनिश्चितता

रसेलच्या मते, तत्त्वज्ञान हे माणसाच्या मनाशी जोडले गेले आहे. मन आध्यात्मिकतेकडे झुकणारे आहे. अध्यात्माचा प्रांत नेहमीच धूसर, अनिश्चितत असते. रसेलच्या मते,तत्त्वज्ञानाच्या अनिश्चिततेचे दोन प्रकार करता येतील. पहिला असा की ही अनिश्चितता व्यावहारिक नाही, तर तात्त्विक असते. तिच्यातून नवी निश्चितता, म्हणज नवे ज्ञान निर्माण होते. संवेदनशील माणूस अनिश्चित उत्तराकाडून निश्चित उत्तराकडे जातो.

दुसरा प्रकार असा की मानवी जीवनतील कित्येक मूलभूत प्रश्न आपल्या आध्यात्मिक जीवनाशी संबंधित आहेत आणि ज्यांना निश्चित उत्तरे देता येत नाहीत. ही आध्यात्मिक अनिश्चितता धार्मिक श्रध्दांच्या मार्फत दूर करण्याचा प्रयत्न असतो. पण त्यातून येणारे उत्तर दिशाभूल करणारे असते. उदाहरणार्थ, नीती म्हणजे काय? हा प्रश्न आध्यात्मिक आहे. आणि त्याचे उत्तर देणे हे मुळात नीतिशास्त्राचे काम आहे. पण उत्तर धर्मशास्त्र देते. धर्मशास्त्राच्या मते धार्मिक असणे म्हणज नैतिक असणे, पण हे उत्तर चुकीचे, गैरसमज निर्माण करणारे आहे, हे निरीक्षणांती कळते. व्यवहारात आपण पाहातो की धार्मिक माणूस अनेक भ्रष्टाचार करतो. मग तो नैतिक कसा? म्हणून धार्मिक समर्थन तात्त्विक समस्यांमधील अनिश्चितता दूर करेल, असे रसेल यांना वाटत नाही.

मग ही अनिश्चितता कायम राहते का? तर रसेलच्या मते, आपण निश्चित उत्तराच्या शोधात असतोच. पण समजा या अनिश्चिततेतून निश्चिततेकडे जरी वाटचाल झाली नाही तरी उत्तरांच्या अनेक शक्यता निर्माण होतात. प्रश्नांविषयीचे आपले कुतूहल त्या जागे ठेवतात. त्यामुळे आपल्या विचारांच्या कक्षा विस्तृत होतात. त्यामुळे विश्वाविषयीचे कुतूहल जागे होते. अशी अनिश्चितता हेच तत्त्वज्ञानाचे एक मूल्य मानता येईल, असे रसेल यांचे मत आहे.

## 4. 'जगाचा नागरिक '

याहीपेक्षा जास्त रसेलच्या मते तत्त्वज्ञानाचे मूल्य आणखी एका गोष्टीत आहे.ते असे की, ''तत्त्वज्ञानामुळे आपण आपल्या संकुचित दृष्टिकोनातून बाहेर पडू शकतो आणि निरपेक्षपणे, नि:पक्षपातीपणे सारे विश्व आपल्या विचारांच्या कक्षेत

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

आणू शकतो. तात्त्विक चिंतन हे मित्र आणि शत्रू, उपयुक्त आणि उपद्रवी, चांगले - वाईट या द्वंद्वांच्या पलिकडे जाऊन साऱ्या विश्वाला गवसणी घालते.असा स्वतंत्र आणि नि:पक्षपातीपणा करणारे मन हेच कृतीमध्ये आणि भावनिक व्यापारांमध्ये स्वातंत्र्य,नि:पक्षपातीपणा, न्याय यांचा आविष्कार घडविते आणि आपल्याला '*जगाचा नागरिक*' बनविते, असे रसेल यांना म्हणावयाचे आहे.

******************************



DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE